दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) | वर्ष ०२ | • अंक ४९ | • RNI : MAHMAR/2023/87818 | रविवार दि.१५ डिसेंबर २०२४ | • पाने ४ | • पान १ | • मो. ९०११७ ०८८४० | • किंमत २ रु.

## आज नागपुरात दुसऱ्यांदा मंत्रिमंडळाचा शपथविधी

# राजभवनात जोरदार तयारी सुरू
# कोण-कोण घेणार शपथ?

**नागपूर (वृत्तसंस्था)**–राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाला काही तास शिल्लक असतानाही मंत्रिमंडळ विस्तारातील नावे उघड न झाल्याने तिन्ही पक्षाच्या इच्छुकांची धाकधुक वाढली आहे. दरम्यान, हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला म्हणजे रविवारी, उपराजधानीतील राजभवनात शपथविधी सोहळ्याची तयारी सुरू झाली. एक हजार पाहुण्यांची आसन व्यवस्था केली जात आहे. राजभवनातील हिरवळीवर शपथविधी होणार आहे.

१५ डिसेंबरला दुपारी ४ वाजता नागपूरमध्ये राजभवनावर हा सोहोळा होत आहे. राज्याच्या राजकीय ईतिहासात नागपूरमध्ये मंत्रिमंडळाचा शपथविधी होण्याची ही दुसरी वेळ आहे. यापूर्वी २२ डिसेंबर १९९१ रोजी छगन भुजबळ यांच्यासह डॉ. राजेंद्र गोडे, जयदत्त क्षीरसागर, वसुधा देशमुख, भरत बाहेकर यांनी मंत्री म्हणून शपथ घेतली होती.शपथविधीसाठी उपराजधानीच्या राजभवन परिसरात भव्य व्यासपीठ व डोमसारखा शामियाना उभारण्याचे काम युद्ध पातळीवर सुरू झाले आहे. बहुतांश संभाव्य मंत्री व सदस्य रविवारी येण्याची शक्यता आहे. कुणाला संधी मिळेल हे स्पष्ट झाले नसल्याने सर्वच सदस्य रविवारी सकाळपर्यंत उपराजधानीत पोहोचतील, असा अंदाज आहे. किती मंत्र्यांचा शपथविधी होणार, हे स्पष्ट झालेले नाही.साधारणत: अधिवेशनानिमित्त अध्यक्ष व सभापती वगळता बहुतांश मंत्री एक दिवस आधी दुपारपर्यंत पोहोचायचे. अन्य मंत्री व सदस्य अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी सकाळपर्यंत यायचे. त्यामुळे प्रशासनाकडे अंतिम टप्प्यातील तयारीसाठी बराच वाव राहायचा. यावेळी शपथविधी होत असल्याने रविवारी सकाळपर्यंत सर्वांचे आगमन झालेले राहिल.



## धान खरेदीसाठी ऑनलाईन पोर्टलवर नोंदणीकरिता ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ
### आ.श्री. सुधीर मुनगंटीवार यांच्या मागणीची दखल
### राज्यभरातील शेतकऱ्यांना मिळाला दिलासा

**मुल । प्रतिनिधी**

खरीप पणन हंगाम २०२४-२५ मध्ये किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत धान खरेदीसाठी ऑनलाईन पोर्टलवर शेतकरी नोंदणी करण्याकरिता ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या मागणीची दखल घेत हा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे राज्यभरातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

पोर्टलवरील नोंदणीसाठी दि. १५ डिसेंबर २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. मात्र, नोंदणी केंद्रावरील गर्दीमुळे नोंदणी प्रक्रिया अद्याप पूर्ण झाली नाही. शेतकरी धान खरेदी नोंदणीपासून वंचित राहू नये. यासाठी मुदतवाढ देण्याची शेतकरी तसेच



अभिकर्ता संस्थानी आ. सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे मागणी केली होती. आमदार सुधीर मुनगंटीवार मागणीची दखल घेत अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे प्रधान सचिवांशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधत शेतकरी नोंदणीकरीता मुदतवाढ देण्याबाबत विनंती केली. तात्काळ दखल घेत काही तासातच शासनाचे अवर सचिवांनी नोंदणीकरीता दि. ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. राज्यातील शेतकऱ्यांना याचा मोठा लाभ होणार आहे. त्यामुळे मागणीची तात्काळ दखल घेऊन शासनस्तरावर पाठपुरावा करत काही तासातच मुदतवाढ मिळाल्याबद्दल शेतकरी बांधवांनी आ. सुधीर मुनगंटीवार यांचे आभार मानले आहे.

### संभाजीराजे छत्रपतींच्या मागणीवर शंभुराज देसाईंची प्रतिक्रिया
## आरोपीला पकडण्यासाठी यंत्रणा कामाला लावण्याची मागणी अधिक योग्य ठरली असती

**नागपूर (वृत्तसंस्था)**–मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणी देशमुख कुटुंबियांना न्याय मिळत नाही, तोपर्यंत येथील आमदाराला मंत्रिपद देऊ नये, अशी मागणी संभाजीराजे छत्रपती यांनी अजित पवारांकडे केली होती. त्यांचा रोखा धनजंय मुंडे यांच्याकडे होता. त्यांच्या या मागणीवर शिवसेना शिंदे गटाचे आमदार शंभुराज देसाई यांनी मोठे विधान केले आहे. एखाद्या खून प्रकरणात आरोपी सापडेपर्यंत इथल्या आमदाराला मंत्री करू नका, असे म्हणण्यापेक्षा आरोपी पकडायला ज्या काही यंत्रणा लावायच्या आहेत, त्या लावल्या पाहिजेत, मागणी संभाजीराजे यांनी केली असती, तर ती अधिक योग्य ठरली असती, असे शंभुराज देसाई म्हणाले.

माजी खासदार संभाजीराजे छत्रपती यांनी शनिवारी मस्साजोग येथे जाऊन संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांचे सांत्वन केले. यावेळी त्यांनी वाल्मिक कराड हा गुन्हा दाखल असूनही खुला फिरतोय, असे म्हणत संताप व्यक्त केला होता. तसेच खूनाचा तपास होईपर्यंत आणि देशमुख कुटुंबाला



न्याय मिळेपर्यंत धनंजय मुंडे यांना मंत्री न करण्याची अजित पवारांकडे विनंती केली होती. यावर शंभुराज देसाई यांनी प्रतिक्रिया देताना उपरोक्त विधान केले.एखाद्या खून प्रकरणात आरोपी सापडेपर्यंत येथील आमदाराला मंत्री करू नका, असे म्हणण्यापेक्षा आरोपी पकडायला ज्या काही यंत्रणा लावायच्या आहेत, त्या लावल्या पाहिजेत, अशी मागणी संभाजीराजे छत्रपती यांनी केली असती, तर ती अधिक योग्य ठरली असती, असे शंभुराज देसाई म्हणाले. कोणत्याही खून प्रकरणात सर्व यंत्रणा काम करत असतात. पोलिस प्रशासन तपासाचे सर्व मार्ग शोधत असते. मी सुद्धा अडीच वर्षे गृहविभागाचा राज्यमंत्री म्हणून काम केले आहे. पोलिस प्रशासन संतोष देशमुख खून प्रकरणतील सर्व धोगेदोरे तपासतील आणि या प्रकरणामागील सूत्रधार, ज्याने कोणी हे कृत्य केले आहे, त्याला शोधून काढतील, असा दावाही शंभूराज देसाई यांनी केला.

शंभुराज देसाई मंत्रिपदाच्या फॉर्म्युलाविषयी बोलताना म्हणाले की, त्याबाबतची अधिकृतपणे माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार हेच देतील. परवापासून हिवाळी अधिवेशन नागपुरात सुरू होत आहे. त्यामुळे मंत्रिमंडळ विस्तारासाठी केवळ उद्याचाच दिवस आहे. या हिवाळी अधिवेशनासाठीच आम्ही सर्व आमदार नागपुरात दाखल झालो असल्याचे देसाई म्हणाले.

### शरद पवार, अजित पवार एकत्र आले तर चांगलेच
## महायुतीची ताकद वाढून देशाच्या विकासात भर पडेल, रामदास आठवले यांचे विधान

**परभणी (वृत्तसंस्था)**– राष्ट्रवादी काँग्रेसच्या फुटीनंतर शरद पवार यांच्या वाढदिवसाला अजित पवार हे त्यांना शुभेच्छा देण्यासाठी गेले होते. त्यावरून राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र यावी अशा भावना व्यक्त झाल्या. यावर आरपीआयचे अध्यक्ष रामदास आठवले यांनी प्रतिक्रिया दिली आहे. आता अजित पवार तर आमच्या सोबतच आहेत पण आता शरद पवार आणि अजित पवार एकत्र झाले तर महायुतीची ताकद वाढेल आणि देशाच्या विकासात भर पडेल, असे विधान रामदास आठवले यांनी केले.परभणीत संविधान प्रतिकृतीच्या अपमान प्रकरणानंतर निघालेल्या मोर्चाला हिंसक वळण लागले. त्यानंतर पोलिसांनी कोम्बिंग ऑपरेशन केले. या सर्व घडामोडीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय मंत्री रामदास आठवले परभणीत आले होते. यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधताना राष्ट्रवादी काँग्रेस एक होण्यासह विविध विषयांवर भाष्य केले.मी वेळोवेळी जेष्ठ नेते शरद पवार यांना आग्रह करीत आलेलो आहे की आपण नरेंद्र मोदी



सोबत महायुतीमध्ये सहभागी व्हावे आणि देशाच्या विकासात हातभार लावावा. आता अजित पवार तर आमच्या सोबतच आहेत पण आता शरद पवार आणि अजित पवार एकत्र झाले तर महायुतीची ताकद वाढेल आणि देशाच्या विकासात भर पडेल. हे दोघे एकत्र आलेले चांगले राहील, असे रामदास आठवले म्हणाले. परभणीतील घटनेवर बोलताना रामदास आठवले म्हणाले, आंबेडकरी जनता संविधानावर प्रचंड प्रेम करते. संविधानाचा अपमान झाल्यानंतर ती रस्त्यावर उतरून निषेध करणारच. या निषेध दरम्यान पोलिसांनी जो लाठी चार्ज केला त्याची चौकशी होणे गरजेचे आहे, अशी मागणी आठवले यांनी केली. कोंबिंग ऑपरेशन करण्याची गरज नव्हती ते मी थांबविण्यासाठी मुख्यमंत्र्यांना सांगितले होते, असेही ते म्हणाले. तसेच निरपराध नागरिकांवर दाखल करण्यात आलेले गुन्हे देखील वापस घेण्यासाठी मी मुख्यमंत्र्यांना सांगणार असल्याचे रामदास आठवले म्हणाले.केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी एक मंत्रिपद आणि एक विधान परिषद द्यावे, अशी मागणी केली आहे. लोकसभेला आम्हाला एकही जागा मिळाली नाही. विधानसभेला दोन जागा मिळाल्या, पण उमेदवार भाजपचाच राहिला. त्यामुळे आता रिपब्लिकन पक्षाला एक मंत्रीपद मिळावे. सोबतच एक विधान परिषदेची जागा मिळावी, असे आठवले म्हणाले.

## शेतकऱ्यांची कर्जमुक्ती कधी?:विजय वडेट्टीवारांचा सरकारवर निशाणा

**मुंबई (वृत्तसंस्था)**– मंत्रिमंडळाचे काय होईल? हा त्यांचा प्रश्न आहे. त्यांचे ते करत बसतील. मात्र, राज्यांमध्ये शेतकरी आत्महत्या करत आहेत, सोयाबीनला भाव नाही, कापसाला भाव नाही, शेतकऱ्यांची कर्जमुक्ती करणार, अशी घोषणा यांनी केली होती. त्यामुळे आम्ही आता शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीची वाट पाहत असल्याचे काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी म्हटले आहे. महायुतीच्या जाहीरनाम्यात राज्य कर्जमुक्त करणार असल्याचा दावा त्यांनी केला होता. मंत्रिमंडळाचा शपथविधी नागपुरात करा किंवा मुंबईत करा. मात्र तुम्हाला बहुमत दिले आहे. त्यामुळे सोयाबीनला भाव कधी देणार? कापसाला भाव कधी देणार? आणि शेतकऱ्यांची कर्जमुक्ती कधी करणार? याचे उत्तर आम्हाला सरकारकडून पाहिजे, असे देखील वडेट्टीवार यांनी म्हटले आहे.आरोग्य विभागाचा राज्यात भट्टाभोळ झाला आहे. बोगस औषधी, बोगस खरेदी आणि मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत असल्याचा आरोप विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. आता नवे सरकार किती स्वच्छ कारभार करते, ते आम्ही पाहणार असल्याचे वडेट्टीवार यांनी म्हटले आहे. राज्यात चोरांचा सुळसुळाट झाला आहे. मात्र, तुम्ही शंभरची नोट खा किंवा पाचशेची नोट खा, किमान लोकांना मूलभूत गरजा आहेत त्या तरी पूरावा, असे आवाहन देखील त्यांनी केले. हिंगोलीमध्ये ओल्या बाळांतीनी, शास्त्रक्रिया झालेल्या महिलांना खाली झोपण्याची वेळ आली आहे. त्यामुळे राज्यात आरोग्य व्यवस्था आहे का? असा प्रश्न देखील त्यांनी उपस्थित केला. हे सरकार केवळ मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री पद मिळवण्यासाठीच आले का? असाही प्रश्न त्यांनी उपस्थित केला. महाराष्ट्रातील जनतेला वाऱ्यावर सोडले जात असल्याचा आरोप त्यांनी केला.

## शेतकऱ्यांची कर्जमाफी,महिलांच्या खात्यात २१०० रुपये कधी देणार?
### अंबादास दानवे यांचा सवाल; हनुमान मंदिरावरून सोमय्यांवर निशाणा

**छत्रपती संभाजीनगर (वृत्तसंस्था)**– महायुतीच्या जाहीरनाम्यात शेतकऱ्यांना पूर्ण कर्जमाफी आणि लाडकी बहिण योजनेमध्ये महिलांच्या खात्यात २१०० रुपये देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. त्यामुळे आता आम्ही या दोन्ही घोषणांची वाट पाहत असल्याचे विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी म्हटले आहे. या माध्यमातून दानवे यांनी नागपूर अधिवेशनात सरकारला घेरण्याचा इशारा दिला आहे.

राज्य सरकार हमी भावाला मुदतवाढ देत आहे. मात्र, कुठेही खरेदी केंद्र चालू नाही. त्यामुळे हमी भावाला मुदतवाढ देऊन काय उपयोग? असा प्रश्न दानवे यांनी उपस्थित केला. या माध्यमातून दानवे यांनी शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव देण्याची तसेच शेतकऱ्यांकडून माल खरेदी करायची मागणी केली आहे.

दादर येथील रेल्वे स्थानकावर असलेले हनुमान मंदिराचा मुद्दा देखील सध्या राज्यात गाजत आहे. भाजप स्वत:ला हिंदुत्ववादी म्हणते. आणि दादर येथील ८० वर्षे जुन्या मंदिराला नोटीस दिली जात असल्यावरुन अंबादास दानवे यांनी भाजपवर टीका केली. किरीट सोमय्या यांनी हनुमान मंदिराच्या दर्शनला जाण्यापेक्षा त्यांच्या स्वत:चे पक्षाचे राज्यात आणि केंद्रात सरकार आहे. त्यांनी सरकारला याबाबत जाब विचारावा, असे आवाहन देखील दानवे यांनी केले आहे.राज्यांमध्ये २३



तारखेला सरकारला बहुमत मिळाले आहे. मात्र तब्बल २० दिवस झाल्यानंतर देखील अद्याप पूर्ण मंत्रिमंडळ नाही. मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री आहेत. मात्र उपमुख्यमंत्र्यांकडे कोणत्याच खात्याचा कारभार नाही. अशा पद्धतीने या राज्याचा कारभार चालू आहे. केवळ मंत्रिमंडळ विस्ताराच्या तारखा समोर येत आहेत. त्यामुळे खरे खोटे हे केवळ मोदी आणि शहा यांनाच माहिती असल्याचे अंबादास दानवे यांनी म्हटले आहे.महाविकास आघाडीच्या विधानसभा निवडणुकीत जागा कमी झाल्या असल्या तरी देखील राज्यातील जनतेसाठी आमचा लढा सुरू राहणार असल्याचे अंबादास दानवे यांनी म्हटले आहे. नागपूर अधिवेशनात सरकारचे वाभाडे काढण्याची गरज नाही. कारण त्यांचे वाभाडे आधीच समोर येत असल्याचे दानवे यांनी म्हटले आहे. हे सरकार कशा पद्धतीने आले, हे अद्याप जनतेला देखील कळाले नाही. अशी सध्या सरकारची स्थिती असल्याचे दानवे यांनी म्हटले आहे.

# विद्यार्थी संघटना नावापुरत्याच!

**स्वार्थापोटी जे सत्तेला चिकटून राहण्याची अपेक्षा ठेवतात.त्यांना नागरिकांनी त्यांची जागा दाखविली पाहिजे. आता गरज आहे ते ज्येष्ठांनी राजकारणात तरुणांना मार्गदर्शन करण्याची. आणि तरुणांनी देशाच्या राजकारणात सक्रिय होण्याची.निकोप लोकशाहीसाठी तरुणांनी राजकारणात येणे काळाची गरज आहे.त्यासाठी विद्यार्थी संघटना पुनर्जीवित करणे आवश्यक आहे.**



पब्लिक टॅग
डॉ.यशवंत घुमे
मो.९८२२२३३९१२

आपला भारत देश लोकशाहीप्रधान देश आहे. आपण गणतंत्र स्वीकारले. लोकांचे, लोकांनी, लोकांसाठी चालविलेले राज्य म्हणजे लोकशाही. या लोकशाहीत कोणीही कायमचा राजा नसतो. सगळे लोकशाहीच्या नियमाप्रमाणे सत्तेत येतजात असतात. जो काम करेल तो लोकप्रिय होईल. सत्तारूढ होईल. कामचुकाराला जनता मतदानाच्या माध्यमातून बाहेरचा रस्ता दाखविल. त्यामुळे नवनवीन नेतृत्व उदयास येत असते. भूतकाळ लक्षात घेता अनेक नेतृत्व नव्याने उदयास आले आहे. मोठ्या हुद्द्यावर बसून कधीकाळी नावारूपास आलेले कित्येक काळाच्या पडद्याआड विस्मृतीत गेले असा हा लोकशाहीचा महिमा आहे. एक चहा विकणारा या देशाचा पंतप्रधान होऊ शकतो. हा चमत्कार केवळ लोकशाहीमुळेच भारतात घडू शकला. झोपडपट्टीतला गरीब असो वा महालातला राजकुमार. दोघांच्याही मताला सारखेच मूल्य आहे. एकसमान मूल्य हे या देशातील लोकशाहीची मौलिक देण आहे. अशा या लोकशाहीप्रधान देशात लोकशाही टिकवून ठेवणे, ती विकसित करणे. एक जागरूक नागरिक म्हणून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्ये आहे. या लोकशाहीच्या प्रगतीत ज्याप्रमाणे ज्येष्ठ नागरिकांचा मोलाचा वाटा असतो. त्याचप्रमाणे युवा वर्गाचा सुद्धा महत्त्वाचा वाटा आहे. आजचा युवा हा उद्याचा नागरिक आहे. त्यांच्यातून उद्याचे जबाबदार राज्यकर्ते निर्माण होऊ शकतात. भविष्यात देशाची धुरा यशस्वीपणे हाकू शकतात. देशाला नावलौकिक मिळवून देऊ शकतात. जनता जनार्धनाला सुखी व आनंदी युवावर्गच करू शकतो. या वयात भावनाशीलता हा महत्त्वपूर्ण गुण त्यांच्यात असल्यामुळे न्याय्य बाजू उचलून धरण्याची क्षमता युवकांमध्ये असते. युवकच परिवर्तन घडवून आणू शकतात. युवकांच्या व्यक्तीत्वाचे अनेक पैलू लक्षात घेता मागील गतकाळात युवकांना राजकारणात विशेष स्थान दिले जात होते. अनेक राजकीय पक्षांच्या विद्यार्थी आघाड्या कार्यरत होत्या. या विद्यार्थी संघटनेच्या माध्यमातून अनेक कार्यकर्ते घडत होते. विद्यार्थी संघटना म्हणजे भावी नेते घडविण्याची कार्यशाळा होती. पूर्वी शाळा महाविद्यालयांमध्ये निवडणुका व्हायच्या. विद्यार्थी आपले वर्ग प्रतिनिधी आणि महाविद्यालय प्रतिनिधी निवडून द्यायचे. या निवडणुकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना राजकीय बाळकडू प्राप्त व्हायचे. या माध्यमातून विद्यार्थ्यांमधून राजकीय नेतृत्व उदयास यायचे. जवळपास सर्वच राजकीय पक्षांच्या विद्यार्थी संघटना होत्या. या विद्यार्थी संघटनाच्या माध्यमातून राजकीय पक्षांची युवकांवरती पकड होती. शाळा महाविद्यालयातील निवडणुकातून त्यांच्या नेतृत्वाला आणि कर्तुत्वाला धार दिली जात होती. राजकीय पैलू पाडले जात होते. परंतु अलीकडे या निवडणुका संपल्यागतच जमा आहे. अनेक राजकीय पक्षांच्या विद्यार्थी संघटना केवळ कागदपत्रे उरल्या की काय असे अलिकडे वातावरण बघता विचार डोक्यात येतात. एनएसयुआय, एबीव्हीपी, एआयएसएफ,भारतीय विद्यार्थी सेना यासह अनेक विद्यार्थी संघटना सक्रिय असायच्या. परंतु अलीकडे त्यांच्या कर्तृत्वाला धार देणाऱ्या शाळा महाविद्यालयातील निवडणुका लोप पावल्याने विद्यार्थी नेतृत्व अल्प प्रमाणामध्ये घडताना, उदयास येताना दिसत आहे. पूर्वी तरूण मंडळी विद्यार्थी संघटनांमध्ये राजकारण करीत.त्यातून अनेक युवक राज्याच्या व देशाच्या राजकारणात उदयास आले आहे. त्याकाळी विद्यार्थी संघटना सक्रिय असल्याने विद्यार्थ्यांच्या नेतृत्वाला झळाळी यायची.परंतु अलिकडे पाहिजे त्या प्रमाणात युवकांतील सुप्त कलागुणांना वाव मिळत नाही. जसे पाहिजे तसे नेतृत्व उदया येताना दिसत नाही. विद्यार्थ्यांमध्ये राजकीय मरगळ आली की काय असाही भास व्हायला लागलेला आहे. शाळा महाविद्यालयातील होणाऱ्या निवडणुकांमध्ये होणाऱ्या अनुचित प्रकाराने शासनाने बंद केल्या. परंतु हे अनुचित आहे. जणू काही घरात मच्छर झाले म्हणजे घर जाळून टाकावे त्याप्रमाणे आहे. घरात मच्छर झाले म्हणून कोणीही घर जाळत नाही. मच्छरांना हाकलून लावण्याचा प्रयत्न करतात. कुठल्याही नाण्याला दोन बाजू असतात. केवळ एका बाजूचा विचार करून चालत नाही. त्यामुळे शासनाने त्याच्यातील केवळ कमतरता लक्षात न घेता सकारात्मक सुद्धा लक्षात घ्यायला पाहिजे. महाविद्यालयातील बंद पडलेल्या निवडणुका नव्याने सुरू झाल्या पाहिजे. त्या झाल्या तर विद्यार्थी दशेत ते सक्रिय होऊन आपल्यातील सुप्त कलागुणांना वाव देतील. उद्या या देशाचे उत्तम राज्यकर्ते बनतील. त्यामुळे राजकीय पक्षांनी सुद्धा लयास गेलेल्या विद्यार्थी संघटनांना नव्याने फुंकर देण्याची गरज आहे. त्यांच्यातील नेतृत्वाला चालना देण्याची आवश्यकता आहे. राजकीय पक्षांनी जर मनात आणले तर त्यांना हे सहज शक्य आहे. लोकशाहीच्या निकोपतेसाठी विद्यार्थी संघटना सक्रिय होणे काळाची गरज आहे. विद्यार्थ्यांच्या भावी नेतृत्वांना जर असेच आपण दाबून टाकणार असू तर येणारा भविष्यकाळ चिंताजनक आहे हे लक्षात ठेवा. आपल्याकडे एकदा राजकारणाची चटक लागलेली माणसे निवृत्त होताना दिसत नाही. त्यांना खुर्चीचा मोह सोडवत नाही.आपली सत्ता खुर्ची निघून जाऊ नये. नवीन प्रतिस्पर्धी निर्माण होऊ नये अशी भीती वाटत असते. विद्यार्थी संघटनाच्या माध्यमातून संभाव्य नेतृत्व उदयास येण्याची शक्यता लक्षात घेता अनेक राजकारणी मंडळींनी मुळातूनच दाबून टाकण्यासाठी विद्यार्थी संघटनेचा प्रभाव केवळ कागदोपत्री ठेवला या शंकेला वाव मिळतो. अन्य देशांमध्ये जेष्ठ नागरिक वय झाले की रजा घेऊन घरी बसतात. नातवंडांना खेळवतात. आवडीचे व्यवसाय करतात. सामान्य नागरिकांप्रमाणे जगतात. आपल्याकडे मात्र ज्यांच्या अर्ध्या गोवऱ्या स्मशानात गेल्या आहे.शरीर साथ देत नाही असेही म्हातारे लखख मान हलवीत राजकारण करतात. ज्याप्रमाणे शासकीय कर्मचारी विशिष्ट वयानंतर सेवानिवृत्त होतात. तसेच राजकीय मंडळींनीही शासकीय कर्मचाऱ्याप्रमाणे निवृत्त झाले पाहिजे. नव्या दमाच्या युवकांना पुढे आणले पाहिजे.

## गोपीनाथ मुंडे जयंती आणि शिवाजीराव शेलार स्मृतिदिना निमित्त विविध कार्यक्रम संपन्न



**अहिल्यानगर | प्रतिनिधी**

स्व.लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या जयंती आणि स्व.शिवाजीराव शेलार(अण्णा) यांच्या स्मृतिदिना निमित्त भारतीय जनता पार्टी,नगर,जय बजरंग ग्रुप,शिवराजे रुद्रा युवा ग्रुप,सूर्यनगर यांच्या वतीने बालघर प्रकल्प तपोवन रोड येथे फळ वाटप कार्यक्रमचे व जनकल्याण रक्तपेढी नगर यांच्या माध्यमातून रक्तदान शिबीर आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी गोपीनाथ मुंडे,शिवाजीराव शेलार,खा दिलीप गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले यावेळी माजी नगरसेवक निखिल वारे, भाजपा युवा मोर्चाचे अध्यक्ष नितीन शेलार,उद्योजक किशोर वाकळे,अनिल ढवण,राजूभाऊ बुधवंत, बंटी ढापसे,आयोजक कैलास गर्जे,मल्हारी दराडे,निलेश भगत,बालघरचे संचालक युवराज गुंड,गणेश कुसळकर,महेंद्र कुसळकर,प्रताप बटुळे,संतोष गर्जे,जनकल्याण रक्तपेढीचे डॉ ओजस मुनोत, शरद बडे, ऋतिक कसणे,ओंकार झोडगे ,आकाश सोनवणे,अतुल गीते आदींसह मोठ्या संख्नेने कार्यकर्ते व विद्यार्थी उपस्थित होते.यावेळी अनेक युवकांनी रक्तदान केले तर मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना फळ वाटप करण्यात आले.

## जामखेड शहराजवळ बिबट्याचा वावर

**जामखेड | प्रतिनिधी**



जामखेड शहर आणि परिसरातील नागरिक गेल्या काही दिवसांपासून बिबट्याच्या धास्तीने त्रस्त आहेत. शहरापासून जवळ असलेल्या भुतवडा परिसरात बिबट्याचा मुक्त वावर सुरू आहे.त्यामुळे शेतकरी तसेच ग्रामस्थांत भयभीत झाले आहेत.

तातडीने बिबट्याला पकडण्याची मागणी लोकांनी केली आहे. जामखेड शहरालगत भुतवडा तलाव आहे. या भागात दोन दिवसांपूर्वी तीन बिबट्यांनी एका गाईचा फडशा पाडला होता. त्यामुळे या परिसरात बिबट्याची दहशत पसरली आहे.

त्यापूर्वी मोहा, साकत घाट या परिसरात अनेकांना बिबट्या आढळून आला होता. सध्या या भागात रब्बीची पिके असल्याने बिबट्याला लपण्याला जागा आहे. शिवाय परिसरात डोंगर आहे. या भागात गेल्या अनेक दिवसांपासून बिबट्याचा वावर सुरू आहे.

पलिकडे बीड जिल्ह्यातील अनेक भागांत बिबट्या सातत्याने दिसून येतो. काही दिवसांपूर्वी तालुक्यातील डोंगरात मोहा, साकत घाटात अनेकांना बिबट्या दिसला. त्यामुळे या भागात बिबट्याची दहशत बसली आहे.दोन दिवसांपूर्वी वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी भुतवडा परिसरासह खैरी मध्यम प्रकल्प, खर्डा परिसराचीही पाहणी केली. लोकांनी बिबट्याचा बंदोबस्त करण्याची मागणी केली असून, पिंजरा लावण्यासाठी वरिष्ठ कार्यालयाला प्रस्ताव पाठविणार आहोत. मात्र जनतेने काळजी घ्यावी, असे आवाहन वन विभागाने केले आहे

## हदगाव तालुक्यात अवैध धंदे जोमात; तर पोलीस प्रशासन 'हप्ता वसुली' करण्यात मग्न



**नांदेड | प्रतिनिधी**

हादगाव पोलीस कार्यक्षेत्रात परिसरात पोलीस ठाण्याच्या हद्दीत सध्या मोठ्या प्रमाणात अवैध धंद्यांचे स्तोम माजले आहे आणि पोलीस प्रशासन कारवाई करण्याऐवजी 'हप्ता वसूल' करण्यात मग्न असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. स्वच्छ प्रतिमा असलेले पोलीस नांदेड चे आईजी उमाप साहेब यांनी यांनी याप्रकरणी लक्ष घालून कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.अनेक खेड्यापाड्यात गावापासून जवळील पोलीस ठाण्याची हद्द आहे. एकूण अनेक गावांचा यामध्ये समावेश आहे.यातील जवळपास प्रत्येक गावामध्ये अवैध गावठी दारू,ताडी,गांजा यांची विक्री राजरोसपणे सुरू आहे. सामान्य नागरिकांना या अवैध धंद्यांचा त्रास होत आहे,मात्र संबंधित व्यावसायिक आणि पोलीस यांचे संगणमत असल्याने याबाबत तक्रार करायची कोठे?असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.तसेच अवैध व्यावसायिकांची दहशत असल्याने नागरिक तक्रार करण्यास पुढे येत नाहीत.

## मांडवगण फराटा येथे मोफत नेत्र तपासणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद






**शिरूर | प्रतिनिधी**

मांडवगण फराटा ग्रामपंचायत आणि एच. व्ही. देसाई नेत्र रुग्णालय महमदवाडी, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्र तपासणी व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले. हे शिबिर आयुष्यमान आरोग्य मंदिर (प्राथमिक आरोग्य केंद्र) येथे पार पडले.

या शिबिरात एकूण २१३ रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली, त्यापैकी २२ रुग्णांना मोतीबिंदूचे निदान झाले. या रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया एच. व्ही. देसाई नेत्र रुग्णालयात करण्यात येणार आहे. शिबिराला शेजारच्या आठ गावांतील नेत्ररुग्णांनी सहभाग नोंदवला.

शिबिराचे उद्घाटन सरपंच समीक्षा फराटे यांच्या हस्ते झाले. या वेळी उपसरपंच पांडुरंग मोरे, आयुष्यमान आरोग्य मंदिराचे वैद्यकीय अधिकारी डॉ. नितीन फाटले, आरोग्य सहाय्यक सांगळे, करपे, एलएसओ कटाळे, फार्मासिस्ट माने, सिस्टर ज्योती बनसोडे (गुजे), परिचर बनसुडे, तसेच ऋषिकेश मोरे, रेश्मा घोडके, आणि अभिजित थोरात हे मान्यवर उपस्थित होते.

या नेत्र तपासणी शिबिरामुळे स्थानिक नागरिकांना मोठा फायदा झाला असून अशा उपक्रमांबद्दल ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

## सेवानिवृत्त बँक कर्मचाऱ्याचा मृतदेह जंगलात सापडला;राहुरीत खळबळ

**राहुरी | प्रतिनिधी**



राहुरी-ताहाराबाद रस्त्यालगत असलेल्या घोरपडवाडी घाटातील जंगलामध्ये जिल्हा बँकेचे सेवानिवृत्त कर्मचारी भाऊसाहेब कचरू ब्राम्हणे यांचा मृतदेह आढळल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. आज (१३ डिसेंबर) सकाळी साडेनऊच्या सुमारास हा प्रकार उघडकीस आला.

चिंचोली फाटा येथील रहिवासी असलेल्या भाऊसाहेब ब्राम्हणे हे काही दिवसांपासून बेपत्ता होते. त्यांच्या बेपत्ताबाबत राहुरी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल होती. आज (१४ डिसेंबर)सकाळी घोरपडवाडी येथील जंगलात एका मृतदेहाचे अस्तित्व आढळून आल्याने स्थानिक नागरिकांनी राहुरी पोलीस ठाण्याला कळविले.

घटनेची माहिती मिळताच पोलीस उपनिरीक्षक समाधान फडोळ आणि त्यांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली. पंचनाम्यादरम्यान घटनास्थळी दुचाकी आणि आधार कार्ड मिळून आले. आधार कार्डावरून मृत व्यक्तीची ओळख पटली. नातेवाईकांना बोलावून मृतदेह हा भाऊसाहेब ब्राम्हणे यांचाच असल्याची खात्री करण्यात आली.

मृतदेह शवविच्छेदनासाठी राहुरी ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली राहुरी पोलीस करत आहेत. मयत ब्राम्हणे यांच्या मागे पत्नी, मुलगा, मुलगी आणि सून असा परिवार आहे. या दुर्दैवी घटनेने त्यांच्या कुटुंबावर शोककळा पसरली आहे.

# शिर्डीतील साई मूर्तीचे होणार थ्रीडी स्कॅनिंग मंदिर २० डिसेंबरला दुपारी राहणार बंद


**अहिल्यानगर | प्रतिनिधी**

अहिल्यानगर :शिर्डी येथील साई समाधी मंदिरातील साईंच्या संगमरवरी मूर्तीची भविष्यात हुबेहूब प्रतिकृती तयार करता यावी. तसेच तब्बल सत्तर वर्षांपूर्वी इटालियन मार्बलमध्ये घडविण्यात आलेल्या या मूर्तीची आजची परिस्थिती काय आहे, याचा अंदाज यावा, यासाठी या मूर्तीचे थ्रीडी स्कॅनिंग केले जाणार आहे.

मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयातील जाणकारांनी तशी शिफारस केली आहे. त्यानुसार तज्ज्ञाची एक समिती स्थापन करण्यात आली. ही समिती २० डिसेंबरला साई मंदिरास भेट देऊन हे थ्रीडी स्कॅनिंग करणार आहेत. त्यामुळे दुपारी पावणेदोन ते साडेचार या कालावधीत साई मंदिर दर्शनासाठी बंद ठेवले जाईल, अशी माहिती साई संस्थानच्या वतीने देण्यात आली.

साईबाबांनी आपल्या हयातीत वापरलेल्या विविध वस्तूंचे संग्रहालय साई मंदिर परिसरात उभारण्यात आले. त्यासाठी या क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय ख्यातीचे जाणकार कै. सदाशिव गोरक्षकर यांचे मार्गदर्शन लाभले. या संग्रहालयातील, तसेच अन्य ठिकाणी असलेल्या बाबांनी वापरलेल्या वस्तूंचे अधिक काळ संवर्धन व्हावे, यासाठी त्यावर तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली विशिष्ट प्रक्रिया करण्याचे काम सध्या सुरू आहे. त्यासाठी देखील छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेतले जात आहे. त्यांनीच पाठविलेल्या कारागिरांकडून हे काम केले जात आहे. साईबाबांची पेंटिग, त्यांचे फोटो, त्यांनी वापरलेल्या धातूच्या व कपड्यांच्या वस्तूंचा त्यात समावेश आहे. त्याचाच एक भाग म्हणून साईंच्या संगमरवरी मूर्तीचे संवर्धन करण्याच्या दृष्टीने पावले उचलली जात आहेत. ही मूर्ती झिजली, तर नाही ना, यावर तज्ज्ञांचे मत मागविण्यात आले. त्यांनी केलेल्या सूचनेनुसार गरम पाणी आणि दह्याचा वापर कमी करण्यात आला आहे. आता भविष्यात या मूर्तीची हुबेहूब प्रतिकृती [illegible]ची गरज भासल्यास तिचे थ्रीडी स्कॅनिंग केले जाणार आहे. साई समाधी मंदिरातील मूर्ती आमचे आजोबा बालाजी तालीम यांनी सत्तर वर्षांपूर्वी घडविली. हजारो वर्षे या मूर्तीला काहीही होणार नाही. मूर्तीसाठी वापरलेल्या इटालियन मार्बलचे हे वैशिष्ट्य आहे. आमच्याकडे या साई मूर्तीची मूळ प्रतिकृती आहे. त्याआधारे आम्ही हुबेहूब नवी मूर्ती घडवू शकतो. साई संस्थानने थ्रीडी स्कॅनिंग करण्याचे योग्य पाऊल उचलले. आम्हाला मात्र या थ्रीडी स्कॅनिंगची गरज नाही.- राजीव तालीम, मूर्तीकार

द्वारकामाईत साईबाबा बसत असत ती शीळा (दगड), साईबाबांच्या लाकडी पादुका, सटका आणि साईंनी वापरलेल्या अन्य सर्व वस्तूंचे संवर्धन करण्यासाठी आवश्यक असलेले लेपन आणि विशिष्ट रसायन वगैरे लावण्याची प्रक्रिया या तज्ज्ञ मंडळींच्या देखरेखीखाली सध्या सुरू आहे.
- तुषार शेळके, जनसंपर्क अधिकारी, साई संस्थान



# श्री संत सद्गुरू जनार्दन स्वामी मौनगिरीजी महाराज समाधी मंदिरात बेट ३५ वी पुण्यतिथी साजरी







**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

अहिल्यानगर जिल्ह्यातील कोपरगाव येथील भारताच्या दिव्य संत परंपरेतील अर्वाचीन महर्षी श्री संत सद्गुरू जनार्दन स्वामी मौनगिरीजी महाराज यांचे दिव्य चरित्र व दिव्य कार्य सर्व परिचित आहे भक्ती, ज्ञान, वैराग्य आणि विशुद्ध प्रेम पावित्र्याचे वंदनीय व्यक्तिमत्व म्हणून त्यांची ओळख होती.

स्वामीजींच्या समाधी मंदिरात बेट, कोपरगाव, जिल्हा अहिल्यानगर येथे श्री संत सद्गुरू जनार्दन स्वामी मौनगिरी महाराज यांची ३५ व्या पुण्यतिथी निमित्त भव्य जपानुष्ठान व श्री गुरुचरित्र पारायण सोहळा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमास उपस्थित राहून विवेक कोल्हे परमपूज्य श्री. संत सद्गुरू जनार्दन स्वामी महाराजांच्या समाधीचे दर्शन व सर्व संतांचे आशिर्वाद घेतले!या प्रसंगी त्यांच्या समवेत, आदरणीय नितीनदादा कोल्हे साहेब यांनी महाप्रसाद वाढण्याची सेवा केली आणि नंतर महाप्रसादाचा देखील लाभ घेतला यावेळी हजारो भाविक भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

मागील आठ दिवसात रोज रात्री आठ वाजता प्रवचन आणि कीर्तनाचे कार्यक्रम देखील येथे नागरिकांच्या प्रचंड उपस्थिती मध्ये पार पडले!!

आज पुण्यतिथी दिनी पहाटे ०५ वाजता स्वामीजींच्या समाधीची महापूजा, पहाटे ०५.३० वाजता नित्यनियम विधी पठण, पहाटे ६.१५ वाजता आरती, सकाळी ०९ ते १२ स्वामींच्या पादुका पूजन आणि सत्संग असे विविध कार्यक्रम देखील पार पडले या पवित्र उत्सवास भाविक भक्त, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहून भक्तीचा लाभ घेतला!या प्रसंगी, परमपूज्य गुरुवर्य मठाधिपती स्वामी रमेशगिरीजी महाराज, स्वामी भोलेगिरी महाराज, स्वामी गणेशगिरी महाराज, स्वामी दिनेशगिरी महाराज,स्वामी सुदामगिरी महाराज, स्वामी राघवेस्वरानंदगिरी महाराज, स्वामी विकासगिरी महाराज,व सर्व वंदनीय साधू महंत,शिवभक्त भाऊ पाटिल, ट्रस्ट चे अध्यक्ष श्री बाळकष्ण होळकर, विश्वस्त श्री अंबादास अंत्रे, श्री विलास कोते, श्री अनिल जाधव, श्री बाळासाहेब चव्हाण, श्री शिवनाथ शिंदे व जय जनार्दन भक्त परिवार पंचक्रोशीतील भक्त परिवार तसेच इ. मान्यवर उपस्थित होते

# बल्लारपूरच्या नवीन न्यायालय इमारतीचा मार्ग मोकळा

## आ.मुनगंटीवार यांच्या पाठपुराव्याला मोठे यश

### न्यायालय इमारत बांधकामासाठी ३६ कोटी ७० लक्ष ७३ हजार रुपयांची प्रशासकीय मान्यता

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

'दिला शब्द केला पूर्ण' यासाठी सुपरिचित असलेले आ. सुधीर मुनगंटीवार यांनी पुन्हा एकदा दिलेला शब्द पूर्ण केला आहे. त्यांच्या पाठपुराव्यामुळे बल्लारपूरच्या नवीन न्यायालयीन इमारतीचा मार्ग मोकळा झाला असून यासाठी ३६ कोटी ७० लक्ष ७३ हजार रुपये निधीची राज्यसरकारने मान्यता दिली आहे. एखादा विषय हाती घेतला की तो पूर्ण होईपर्यंत पाठपुरावा करण्यात आ.सुधीर मुनगंटीवार यांचा हातखंडा आहे. त्यांच्या या खास कार्यशैलीची प्रचिती पुन्हा एकदा आली आहे.



बल्लारपूर येथे नवीन न्यायालयीन इमारत बांधण्यासाठी ३६ कोटी ७० लक्ष ७३ हजार रुपयांच्या अंदाजित खर्चाच्या कामाला प्रशासकीय मान्यता देण्यात येत असल्याचे शासन निर्णयात म्हटले आहे. ही नवीन न्यायालयीन इमारत बल्लारपूरच्या वैभवात भर पाडणारी असेल, असा विश्वास व्यक्त होत आहे. या इमारतीमध्ये तळमजला, त्यावर तीन मजले, पाच कोर्ट हॉलचा समावेश असेल. याशिवाय अग्नीशमन यंत्रणा, सीसीटीव्ही, वातानुकुलित व्यवस्था, लिफ्ट, पाणीपुरवठा, जलसंचय आदींचा समावेश असणार आहे.बल्लारपूर येथे नवीन न्यायालयीन इमारत व्हावी, येथे अद्ययावत सोयीसुविधा निर्माण व्हाव्यात, सुसज्ज अशा कोर्टरुम असाव्यात, यासाठी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी राज्य सरकारकडे प्रस्ताव सादर केला होता. त्यानंतर त्यांनी नियमित पाठपुरावा केला. त्यांच्या पाठपुराव्याला यश आले असून इमारतीच्या बांधकामाला प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. न्यायदान करणारी यंत्रणा आणि न्याय मागण्यासाठी येणारा सर्वसामान्य माणूस यांची मुलभूत सोयीसुविधांच्या बाबतीत गैरसोय होणार नाही, याची पूर्ण काळजी बांधकामादरम्यान घेतली जाईल, असा विश्वास आ. मुनगंटीवार यांनी व्यक्त केला आहे.

# चिखलोली रेल्वे स्थानकाच्या कामाला मिळणार गती

## मुंबई रेल्वे विकास महामंडळाकडून निविदा जाहीर





**बदलापूर । प्रतिनिधी**

अनेक वर्ष रखडलेला चिखलोली रेल्वे स्थानकाच्या कामाने वेग घेतला आहे रेल्वे स्थानकाच्या उभारणीसाठी मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशनकडून दोन प्रकारच्या निविदा जाहीर केल्या आहेत त्यामुळे लवकरच रेल्वेत 'यापुढील स्थानक चिखलोली' अशी आवाज ऐकायला मिळणार आहे अंबरनाथ आणि बदलापूर रेल्वे स्थानकांच्या मध्ये चिखलोली स्थानक नव्याने उभे राहात आहे चिखलोलीत होणाऱ्या रेल्वे स्थानकासाठी ओव्हरहेड उपकरणे कार्यान्वित करणे तसेच स्थानकाची उभारणी अशा दोन निविदा काढल्या आहेत तसेच मागील काही महिन्यांपासून स्थानकाच्या प्रत्यक्ष जागेवर विविध प्रकारची कामे सुरू आहेतमुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशनच्या माध्यमातून राज्य सरकारच्या भागीदारीत या स्थानकाची उभारणी केली जात आहे. मुंबई नागरी परिवहन प्रकल्प ३ अ च्या माध्यमातून कल्याण आणि बदलापूर स्थानकांदरम्यान १४ किलोमीटर लांबीची एक हजार ५१० कोटी रुपयांच्या खर्चातून तिसरी-चौथी मार्गिका टाकण्याचे काम हाती घेतले आहे त्याचबरोबर चिखलोली स्थानकाचे कामदेखील सुरू आहे. नव्या स्थानक परिसरात ओव्हरहेड उपकरणे उभारणे, त्यांचे आरेखन, तपासणी आणि कार्यान्वित करण्याच्या कामाची निविदा मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशनच्या माध्यमातून जाहीर करण्यात आली आहे यासोबतच चिखलोली रेल्वे स्थानकाच्या प्रत्यक्ष बांधकामाचीही निविदा जाहीर केली आहे. ११ कोटी ४८ लाख २हजार ७५९ रुपये आणि २१ कोटी ६४ लाख ३२ हजार ९७४ रुपयांच्या दोन निविदांचा यात समावेश आह

# निकृष्ट कामामुळे रेल्वे भुयारी मार्ग धोकादायक

## लोखंडी सळ्यांमुळे अपघाताचा धाका





**मोहोळ । प्रतिनिधी**

वैराग राज्य मार्ग क्र. १४१ वरील मलिकपेठ (ता. मोहोळ) येथील रेल्वे भुयारी मार्गाचे निकृष्ट कामामुळे काँक्रीट फुटून तीन फुटांपर्यंतच्या लोखंडी सळ्या बाहेर आल्या आहेत. या सळ्या वाहनांच्या टायरमध्ये घुसून गंभीर अपघात घडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे प्रवासी आणि वाहनचालक आपला जीव मुठीत धरून प्रवास करत आहे.

भुयारी मार्गाचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे असल्याचे येथील प्रवाश्यांनी आणि नागरिकांनी सांगितले आहे. रेल्वे प्रशासन व ठेकेदाराच्या दुर्लक्षामुळे हा प्रकार घडला आहे. सळ्या उघड्या राहिल्यामुळे त्यांना गंज लागला आहे, तर रस्त्याचे काँक्रीटीकरणही सपाट नसल्याने चढ-उतार व खाचखळगे तयार झाले आहेत. पावसाळ्यात पाणी साचल्याने वाहने घसरून अपघात होत आहेत.

मलिकपेठसह नरखेड, देगाव, वाळूज, घाटणे व अन्य २५ गावांतील नागरिकांमध्ये संताप निर्माण झाला आहे. अपूर्ण कामामुळे वाहनचालक व प्रवासी समस्यांचा सामना करत आहेत. यामुळे प्रशासनाने तत्काळ दखल घेऊन दुरुस्ती करण्याची मागणी नागरिक व प्रवाश्यांकडून होत आहे. भुयारी मार्गाचे काम २०१८ मध्ये सुरू झाले होते, मात्र आजतागायत अपूर्ण अवस्थेत आहे. लोखंडी सळ्यांमुळे धोका निर्माण झाला असून अनेक ठिकाणी गाळ साठल्याने रस्ता वाहतुकीसाठी अडचणीचा बनला आहे. सर्वसामान्यांचा जीव गेल्यावरच दुरुस्ती केली जाणार का? असा सवाल ग्रामस्थ उपस्थित करत आहेत. रेल्वे प्रशासनाने तातडीने कारवाई करून भुयारी मार्गाची दुरुस्ती करावी, अन्यथा आंदोलन छेडले जाईल, असा इशारा नागरिकांनी दिला आहे

# निवडणुकीनंतर आमदार किसन कथोरे मतदारसंघामध्ये सक्रिय!




**बदलापूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधानसभा निवडणूक काही दिवसापूर्वी पार पडली असून त्यामध्ये महायुतीचे मुरबाड मतदारसंघाचे उमेदवार किसन कथोरे मोठ्या मताधिकांनी निवडून आले मतदार संघामध्ये झालेल्या विकास कामाच्या मुद्द्यावरून निवडून आलेले कथोरे यांची मतदारसंघांमध्ये काम करण्याची एक वेगळीच शैली असून ते आता पुन्हा आपल्या मतदारसंघांमध्ये काम करण्यास सक्रिय झाले आहेत त्यांनी आपल्या मतदारसंघांमध्ये विविध कामांचे भूमिपूजन व लोकार्पण सोहळ्या सुरुवात केले आहे मुरबाड तालुक्यातील अनेक गावांमध्ये विविध विकासकामांचे भूमिपुजन करुन विविध विकासकामांचे लोकार्पण सोहळा आमदार किसन कथोरे हस्ते पार पडला आहे तसेच रब्बी हंगाम चालु झाला असून शेतकऱ्यांच्या गरजा समजून कथोरे यांनी शेतकऱ्यांना हरभरा,मसूर इत्यादी बियाणांचे मोफत वाट केले आहे लाडक्या बहिणींचा निवडणुकीमध्ये मोठ्या प्रमाणात फायदा झाला असून आता कथोरे यांनी महिलांना उज्वला गॅसचे मोफत वाटप केले आहे तसेच ग्रामस्थांना आयुष्मान कार्डचे वाटपही करण्यात आले यावेळी गावकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती राहून लाभ घेतला व आमदार कथोरे याचे आभार मानले



नागभिड तालुक्यातील गोवारपेठ रस्त्यालगत शेतशिवारात मोवरीचे पिक जोमात आले असुन त्याला लागलेली पिवळी फुले खुप आकर्षीत वाटत आहेत.(छाया:प्रणय बांगरे. )

# वैशालीताई लांजेवार यांचा राज्यस्तरीय काव्य संग्रहात समावेश;माळी समाजाकडून सत्कार

**तळोधी बा. । प्रतिनिधी**

राष्ट्रीय शिक्षण दिनानिमित्त शिरूर अनंतपाळ येथे आयोजित तिसऱ्या श्री अनंतपाळ राज्यस्तरीय ग्रामीण मराठी कवी संमेलन २०२४ मध्ये तळोधी (बा.) येथील कवयित्री वैशालीताई लांजेवार यांचा विशेष सन्मान करण्यात आला. त्यांच्या दोन कवितांचा समावेश कवितेच्या बागेत या काव्यसंग्रहात करण्यात आल्याबद्दल त्यांना राज्यस्तरीय मान्यता प्राप्त झाली आहे.

वैशालीताई लांजेवार यांना बालपणापासूनच कवितेची आवड असून, आजतागायत त्या हा छंद सातत्याने जोपासत आहेत. त्यांच्या कवितांचे समाजमाध्यमांवर दररोज प्रकाशित होणे हा त्यांचा विशेष परिचय आहे. शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातही त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे, ज्यामुळे त्या ताई या नावाने ओळखल्या जातात. राज्यस्तरीय सन्मानामुळे वैशालीताई यांचे सर्वत्र अभिनंदन होत असून, या निमित्ताने महात्मा फुले माळी समाज तळोधी (बा.) च्यावतीने त्यांचा शाल व श्रीफळ देऊन गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाला माळी समाजाचे अध्यक्ष प्रा. सचिन वाढई, उपाध्यक्ष चंदू निकोडे, सचिव नितीन भेंडाळे, तसेच गजानन गावतुरे, अजय बारस्कर, विक्रम चुटे, लोकेश कावळे, खवीश वाढई, विवेक चुटे व त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.



# जिद्द,चिकाटी व मेहनतीने यशाचे शिखर गाठता येते-संग्राम जगताप

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

जिल्ह्यामध्ये चांगले क्रिकेटर निर्माण करण्यासाठी बालवयातच क्रिकेटचे धडे मिळावेत यासाठी लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन होणे गरजेचे आहे. मागील ८ वर्षांपासून बाळासाहेब पवार स्मृती करंडक क्रिकेट स्पर्धेतून चांगले खेळाडू निर्माण होत आहेत. १९ वर्षांखालील भारतीय क्रिकेट संघात जिल्ह्यातील किरण चोरमले आणि अनुराग कवडे हे दोन खेळाडू खेळत आहेत, ही आपल्यासाठी अभिमानाची बाब आहे. जिद्द, चिकाटी व मेहनतीच्या जोरावर यशाचे शिखर गाठता येते, असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

वाकोडी येथील साईदीप मैदानावर अहमदनगर जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या मान्यतेने व आंजनेय प्रतिष्ठान आयोजित बाळासाहेब पवार स्मृती करंडक जिल्हास्तरीय क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आनंदऋषी हॉस्पिटलचे डीएम कार्डिओलॉजिस्ट डॉ. राहुल अग्रवाल तसेच रणजीपटू अनुपम संकलेचा, सुमतीलाल कोठारी, प्रा. माणिकराव विधाते, गणेश गोंडाळ, अरुण नाणेकर, डॉ. राहुल पवार, कपिल पवार, पी. डी कुलकर्णी, संदीप पवार, दिलीप पवार, संदीप घोडके, निखिल पवार, अजय कविटकर आदी उपस्थित होते. कपिल पवार म्हणाले की, बाळासाहेब पवार स्मृती करंडक जिल्हास्तरीय क्रिकेट स्पर्धेला ८ वर्षे पूर्ण झाली आहेत. या स्पर्धेमध्ये १४,१६ व १९ वर्षांखालील खेळाडू खेळत असून पहिल्यांदाच गुलाबी चेंडूवर ही स्पर्धा होत आहे. या स्पर्धेमध्ये जिल्हाभरातील सुमारे ४५० खेळाडू सहभागी होणार आहेत. १९ वर्षाखालील गटात ८ संघ सामील झाले असून हे सामना २० षटकांचे होणार आहेत. १४ व १६ वर्षांखालील मुलांना क्रिकेटचे अचूक ज्ञान मिळावे जास्त वेळ मैदानावर थांबता यावे यासाठी ४० षटकांचा सामना होणार आहे. यात १४ वर्षांखालील गटात १२ संघ सामील झाले तर १६ वर्षांखालील गटात ८ संघ सामील झाले आहे. हे सर्व सामने बाद पद्धतीने खेळविले जात आहे. स्पर्धेच्या माध्यमातून खेळाडू घडला जात असतो. त्यासाठी बाळासाहेब पवार स्मृती करंडक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले आहे, असे त्यांनी सांगितले.



# लग्नाचा वाढदिवस सामाजिक बांधिलकीतून साजरा

## सचिन-आरती बापुरे दाम्पत्याचा आदर्श उपक्रम





**उदगीर । प्रतिनिधी**

लग्नाचा वाढदिवस केवळ आनंद साजरा करण्याचा क्षण न ठेवता, तो समाजाच्या हितासाठी कसा उपयोगी ठरवायचा, याचा आदर्श सचिन रामचंद्र बापुरे आणि आरती सचिन बापुरे या दाम्पत्याने घालून दिला आहे. १४ डिसेंबर २०२४ रोजी आपल्या लग्नाच्या वाढदिवसानिमित्त त्यांनी भव्य रक्तदान शिबिर आयोजित करून सामाजिक बांधिलकी जपली. मानवी रक्ताला पर्याय नाही, कारण ते कृत्रिमरित्या तयार करता येत नाही. रक्तदानाद्वारे कित्येकांचे प्राण वाचवता येतात, याची जाणीव ठेवत बापुरे दाम्पत्याने रक्तदानाचा महत्त्वपूर्ण उपक्रम राबवला. विशेष म्हणजे त्यांनी दरवर्षी रक्तदान करण्याचा संकल्प केला आहे.

हा रक्तदान उपक्रम जिव्हाळा ग्रुपच्या सहकार्याने अंबरखाने ब्लड बँक, बनशेळकी रोड, उदगीर येथे पार पडला. या उपक्रमामध्ये अनेक रक्तदात्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. कार्यक्रमादरम्यान दाम्पत्याने सर्व रक्तदात्यांचे आभार मानत रक्तदानाचा संदेश समाजात रुजवण्याचे आवाहन केले.

सचिन आणि आरती बापुरे यांच्या या आदर्श उपक्रमामुळे सामाजिक जबाबदारीची जाणीव इतरांनाही प्रेरणादायी ठरली आहे.

# जिल्ह्यात २७ डिसेंबरच्या मध्यरात्रीपर्यंत मनाई आदेश लागू

**बीड । प्रतिनिधी**

मराठा, ओबीसी,धनगर समाजाचे आरक्षण मागणी अनुषगांने आंदोलने चालू आहेत दि. १६ डिसेंबर २०२४ पासून हिवाळी अधिवेशन सुरु होत आहे.तसेच आगामी कालावधीत दत्त जयंती उत्सव साजरा होणार आहे. महाराष्ट राज्याचे हिवाळी अधिवेशनाच्या अनुषंगाने विविध राजकीय पक्ष संघटनेच्या वतीने त्यांच्या न्याय मागण्यासाठी विविध प्रकारचे निदर्शने आंदोलने होण्याची शक्यता असून अचानक घडणारे घटनावरुन व किरकोळ कारणावरुन तणाव निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच आरक्षणच्या मागणीसाठी सर्व समाज व राजकीय पक्ष अक्रमक आहे या करिता कायदा व सुव्यवस्था अबाधित राहवी यासाठी मनाई आदेश जारी करण्यात आले असल्याचे अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी प्रसिध्दी पत्रकात नमूद केले आहे.


दिनांक १३ डिसेंबर २०२४ रोजीचे ००.०१ वाजेपासून ते २७ डिसेंबर २०२४ रोजीचे २४.०० वाजेपर्यंत बीड जिल्हयात या कालावधीत महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये काढण्यात येणा-या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने यासारख्या आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येण्यास निर्बंध राहील. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहावी या करीता कलम ३७ (१) (३ ) अन्वये मनाई आदेश जारी केला आहे.शासकीय कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-यां व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी किंवा त्यांच्या जवळपास खालील बाबीस मनाई करण्यात आली आहे. या अन्वये शस्त्र, सोटे ,काठी, तलवार, बंदूक, लाठया, काठया, कोणतेही दाहक पदार्थ, किंवा स्फोटके, दगड, किंवा इतर क्षेपाणस्त्रे, शरीरास इजा होणा-या वस्तू बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. आवेशी भाषणे, अंगविक्षेप, विडांबनात्मक नकल, सभ्यता, नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षिता धोक्यात येईल, किंवा अराजकता माजेल अशी चित्रे, निशाणी, घोषणा फलक किंवा इतर कोणतीही वस्तू जवळ बाळगू नये.

# मलकापूरमध्ये क्षुल्लक कारणावरून दोन युवकांत हाणामारी;पोलिसांनी घेतली परिस्थिती नियंत्रणात

**मलकापूर । प्रतिनिधी**

शहरातील शुभम पान मंदिराजवळ १३ डिसेंबर रोजी रात्री ९:३० वाजताच्या सुमारास क्षुल्लक कारणावरून वाद होऊन दोन युवकांमध्ये हाणामारी झाली. धिरज पाटील व वसीम मेमन हे दोघे एकमेकांकडे रागाने पाहत असल्याने वादाला सुरुवात झाली, ज्याचे पुढे हाणामारीत रूपांतर झाले.

घटनेची माहिती मिळताच पोलिस निरीक्षक घटनास्थळी दाखल झाले आणि परिस्थिती नियंत्रणात आणली. मात्र, काही वेळानंतर गांधी चौक व निमवाडी चौक येथे मोठा जमाव जमल्याचे दिसून आले. पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करून वाद वाढविणाऱ्या युवकांना ताब्यात घेतले.



या घटनेमुळे शहरात अफवा पसरू नयेत आणि कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी स्थानिक पोलिसांनी सतर्कता बाळगली. माहिती मिळताच अप्पर पोलीस अधीक्षक अशोक थोरात यांनी मलकापूर पोलिस ठाण्यात येऊन घटनास्थळाची पाहणी केली. घटनास्थळी पोलिस निरीक्षक गणेश गिरी, पोलिस निरीक्षक संदिप काळे, सहाय्यक पोलिस निरीक्षक करूणाशील तायडे, ईश्वर वर्गी, उपनिरीक्षक सुरेश रोकडे, डिबी पथक व आरसीपी पथकाने परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी कठोर पाऊले उचलली. या प्रकरणी पोलिसांनी धिरज पाटील व वसीम मेमन या युवकांना ताब्यात घेतले असून, तपास सुरू आहे. दरम्यान, पोलिसांनी नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले आहे.

# शालेय विद्यार्थिनीच्या मृत्यूप्रकरणी गटशिक्षणाधिकाऱ्यांचा अहवाल सादर

**सातारा । प्रतिनिधी**

कन्या शाळा, सातारा येथे खेळताना झालेल्या दुर्दैवी अपघातात अक्षता विजय देशमुख या विद्यार्थिनीचा मृत्यू झाल्याने शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली आहे. या घटनेनंतर गटशिक्षणाधिकारी रविंद्र खंदारे यांनी शाळेस भेट देऊन सविस्तर माहिती घेतली आणि शुक्रवारी माध्यमिक शिक्षणाधिकारी प्रभावती कोळेकर यांना अहवाल सादर केला.

**शाळा व्यवस्थापनावर कारवाईची शक्यता**

**या घटनेनंतर शाळा व्यवस्थापनाच्या जबाबदारी विषयी प्रश्न निर्माण झाले असून, कोणती कारवाई होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**

कन्या शाळेच्या मैदानावर कबड्डी खेळताना अक्षता विजय देशमुख या विद्यार्थिनीचा तोल जाऊन ती खाली पडली, त्यामुळे डोक्याला गंभीर दुखापत झाली. तिला तत्काळ जिल्हा रुग्णालयात दाखल करण्याचा प्रयत्न केला गेला, मात्र उपचारापूर्वीच तिचा मृत्यू झाला. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन गुरुवारी पंचायत समितीच्या शिक्षण विभागाच्या विस्तार अधिकाऱ्यांनी शाळेस भेट देऊन प्राथमिक तपास केला. त्यानंतर गटशिक्षणाधिकारी खंदारे यांनी शुक्रवारी सकाळी शाळेची पाहणी करून मुख्याध्यापिका आणि शाळा व्यवस्थापनाकडून माहिती घेतली. याआधारे तयार केलेला अहवाल माध्यमिक शिक्षणाधिकारी प्रभावती कोळेकर यांना सुपूर्द करण्यात आला आहे.

# वैजापूर तालुक्यात भरदिवसा चोरांचा धुमाकूळ;नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

**वैजापूर । प्रतिनिधी**

वैजापूर तालुक्यात चोरांनी धुमाकूळ घातला असून, दिवसाढवळ्या चोरीच्या घटना वाढल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. १४ डिसेंबर रोजी भरदुपारी दोन ठिकाणी चोऱ्या झाल्या, ज्यामुळे शेतकरी व स्थानिक नागरिक अस्वस्थ झाले आहेत.

लाख खंडाळा (वैजापूर) येथे दुपारी एकच्या सुमारास दीपक शांताराम वैद्य यांच्या घरी चोरी झाली. घरात कोणी नसल्याचा फायदा घेत चोरट्यांनी घराचे कुलूप तोडले व १२ हजार रुपये रोख व ८-९ ग्रॅम सोने चोरून नेले. ही घटना वैद्य यांना दुपारी तीनच्या सुमारास कळाली, जेव्हा त्यांनी घरातील पसारा व कपाटांची उघडझाप पाहिली. त्यांनी तातडीने वैजापूर पोलिसांना याची माहिती दिली, त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी पाहणी केली.



यानंतर, ग्रामीण भाग एक येथील फुलेवाडी रोडवरील राजपूत वस्तीतही दुपारी दोनच्या सुमारास दुसरी घटना घडली. बंद घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी ८० ते ८५ हजार रुपयांची रोख रक्कम व ३-४ तोळे सोने लंपास केले. संजय हरिचंद्र राजपूत यांच्या तक्रारीनंतर सहाय्यक पोलीस निरीक्षक देशमुख व त्यांच्या पथकाने घटनास्थळी पाहणी केली.

तालुक्यात वाढत्या चोरीच्या घटना शेतकरी व नागरिकांसाठी चिंतेचा विषय ठरत आहेत. सध्या कांदा काढणीसाठी शेतांमध्ये मोठ्या प्रमाणावर काम सुरू आहे, मात्र चोरांच्या भितीने शेतकऱ्यांना शेतात जावे की घरीच राहावे, हा प्रश्न निर्माण झाला आहे. नागरिकांनी पोलिसांकडून जलद तपासाची अपेक्षा व्यक्त केली असून, चोरट्यांचा बंदोबस्त करून नागरिकांना भयमुक्त करावे, अशी मागणी केली जात आहे. पुढील तपास वैजापूर पोलीस करत आहेत.

# करडखेल येथे धुळोबा मंदिर बांधकामाचे भूमिपूजन



**उदगीर । प्रतिनिधी**

करडखेल येथे धुळोबा मंदिराच्या बांधकामासाठी आयोजित सभागृहाचे भूमिपूजन नुकतेच करण्यात आले. या बांधकामासाठी तत्कालीन मंत्री आणि आमदार संजय बनसोडे यांनी १० लाख रुपयांचा निधी मंजूर केला होता.

या भूमिपूजन सोहळ्याचे मुख्य मानकरी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक आणि राष्ट्रवादीचे कार्याध्यक्ष वसंत पाटील होते.

या सोहळ्याला सरपंच बाळासाहेब मुळे, उपसरपंच गिरीश राघू, पोलीस पाटील एकनाथ कसबे, व्हाईस चेअरमन मनोहर हत्ते, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पांडुरंग कसबे, सेवानिवृत्त शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष बबनराव नरवटे यांसह गावातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

धुळोबा मंदिराचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर गावासाठी एक महत्त्वाचे धार्मिक केंद्र निर्माण होणार आहे. यामुळे गावकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

# पाथरी तालुक्यात रात्रीच्या वेळी अवैध वाळू वाहतूक सुरू

## महसूल प्रशासन व पोलीस प्रशासनाची अर्थपूर्ण व्यवहारातून डोळेझाक चालू असल्याची चर्चा

**पाथरी । लक्ष्मण उजगरे**

गोदावरी नदीचे पात्र मोठे असल्याने पाथरी तालुका हा परभणी जिल्ह्यातील अवैध वाळू उपसा करणारा तालुका म्हणून ओळखला जातो. त्यातच पुन्हा गोदावरी नदी पात्रातील पाणी ओसरु लागल्याने वाळू उपसा सुरू झाला आहे याकडे मात्र पोलीस प्रशासन व महसूल प्रशासनाकडून डोळे झाक होताना दिसत आहे.

सविस्तर बातमी अशी की पाथरी तालुक्यामध्ये नाथरा ते मुद्गल असे मोठे गोदावरी पात्र असताना मागच्या वर्षी शेकडो ब्रास वाळूची अवैध वाहतूक उपसा झाला परंतु या अवैध वाळू उपसा करणारे व अवैध वाहतूक करणाऱ्या प्रशासनाने व पोलीस प्रशासनाने ठोस कारवाई न केल्याने यावर्षी परत पावसाळा संपल्यानंतर गोदावरी नदीकाठच्या गोंडगाव उमरा येथून मागील पंधरा दिवसापासून केणीच्या व तराफ्याच्या साह्याने शेकडो ब्रास वाळू उपसा करून रात्रीच्या वेळी बिन बोभाटपणे गोंडगाव-उमरा-लोणी-बाबुलतार मार्गे पाथरी व मानवत येथे खुल्याआम कालबाह्य झालेल्या हायवा टिप्पर व ट्रकच्या साह्याने वाळूची वाहतूक चालू असताना पोलीस प्रशासन अथवा महसूल प्रशासनाकडून सदरील वाहनांवर कारवाई होताना मात्र दिसून येत नाही यामुळे नागरिकातून सदरील वाळूमाफियांकडून पोलीस प्रशासन व महसूल प्रशासनास हप्ते चालू असल्याचे बोलले जात असून त्यामुळेच रात्रीच्या वेळी मोठ्या प्रमाणावर खुल्या अवैध वाळू उपसा करणारे वाहने चालू असताना पहावयास मिळत आहेत याकडे जिल्हा महसूल प्रशासन व जिल्हा पोलीस अधीक्षकांनी लक्ष देऊन सदरील अवैध वाळू उपसा अवैध वाहतूक वाहनावर ठोस कारवाई करण्याची गरज दिसून येत आहे.

**रस्त्यावर जागोजाग खबऱ्यांच्या टोळ्या बसलेल्या**

**रात्रीच्या वेळी पाथरी तालुक्यात गोंडगाव उमरा येथून मोठ्या प्रमाणावर अवैध वाळूचा उपसा करून कालबाह्य झालेल्या वाहनाच्या मार्फत अवैध वाहतूक चालते. या वाहनांवर कारवाई होऊ नये म्हणून प्रशासन किंवा पोलीस पथक यांच्यावर लक्ष ठेवण्यासाठी हर्षवर्धन पेट्रोल पंप च्या बाजूस असलेल्या सोनपेठ फाट्यावर तुरा फाट्यावर बाबळगाव फाट्यावर आणि पोखरणी फाट्यावर वाळू माफियांचे खबऱ्यांच्या मोठमोठ्या टोळ्या गस्तीवर असतात यावरही पोलीस प्रशासनाने करडी नजर ठेवून या खबऱ्यां वर कायदेशीर रित्या कठोर कारवाई करावी अशी मागणी सामान्य जनतेतून होताना दिसू**

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .

# मतिमंद मुलांच्या शाळेत बौधिक अक्षम दिन साजरा

**अहिल्यानगर | प्रतिनिधी**

अहिल्यानगर शहरातील टिळक रोड येथील मतिमंद विकास शिक्षण मंडळ संचलित मतिमंद मुलांच्या शाळेत जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,मतिमंद मुलांची शाळा आणि ज्योत्स्ना उद्योग केंद्र सोसायटी कार्यशाळेच्या संयुक्त विद्यमाने बौद्धिक अक्षम दिन साजरा करण्यात आला.या कार्यक्रमातून बौद्धिक अक्षम विद्यार्थ्यांच्या पालकांचे मनोबल उंचाविण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले.बौद्धिक अक्षम दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या सचिव तथा न्यायाधीश भाग्यश्री पाटील यांच्या हस्ते झाले.यावेळी सह दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) एम.पी.पांडे, सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) ए.व्ही.ढोरे,मतिमंद विकास शिक्षण मंडळाचे जेष्ठ संचालक अविनाश कुलकर्णी,शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष निलेश वैकर,शालेय व्यवस्थापन समितीचे खजिनदार उदय भनगे उपस्थित होते.न्यायाधीश भाग्यश्री पाटील म्हणाल्या की,चौरंगावरील देवपूजा करण्यापेक्षा दिव्यांगांची सेवा हीच खरी ईश्वर सेवा आहे.पालकांनी खचून न जाता,तुम्ही सक्षम असल्यानेच हे विशेष मूल देवाने तुमच्या पदरात टाकले आहे.या विशेष मुलांना दिशा देऊन त्यांचे भवितव्य घडविण्याचे त्यांनी आवाहन केले. तर या मुलांबाबत शासकीय कामांमध्ये काही अडचणी आल्यास जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या माध्यमातून मदत करण्याचे त्यांनी आश्वासन दिले. न्यायाधीश एम.पी.पांडे म्हणाले की,बौद्धिक अक्षम विद्यार्थ्यांमध्ये वेगवेगळ्या क्षमता असून,ते ओळखण्याची गरज आहे.ही मुले कुठेही कमी नाहीत.एकमेकांच्या हातात हात घेऊन प्रत्यक्ष स्पर्धेत ते उतरतात.थक्क करणारे कौशल्य त्यांच्यात असून, त्याला चालना देण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.न्यायाधीश ए.व्ही.ढोरे यांनी पालकांना दिव्यांग व्यक्तीचे अधिकार आणि दिव्यांग व्यक्तींचे हक्क अधिनियम २०१६ याबद्दल कायदेशीर मार्गदर्श न केले.प्रास्ताविक कार्यशाळेचे प्रमुख भाऊसाहेब कदम यांनी केले.पाहुण्यांचा परिचय निदेशक सुशीला जाधव यांनी करून दिला.बौद्धिक अक्षम दिनाचे महत्त्व शाळेचे वाचा उपचार तज्ञ विक्रम उंडे यांनी सांगितले. यावेळी पालक, विद्यार्थी आणि सर्व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेच्या विशेष शिक्षक पुष्पा बनकर यांनी केले. संस्थेचे जेष्ठ संचालक अविनाश कुलकर्णी यांनी आभार मानले.



# १५ डिसेंबरला भंडारा येथे जिल्हा क्रॉस कंट्री स्पर्धेचे आयोजन

**भंडारा | प्रतिनिधी**

भंडारा जिल्हा थलेटिक्स संघटनेच्या वतीने १५ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ८ वाजता छत्रपती शिवाजी स्टेडियम (जिल्हा क्रीडा संकुल) येथे जिल्हास्तरीय क्रॉस कंट्री स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा १६, १८ आणि २० वर्षांखालील मुले-मुली तसेच खुल्या वयोगटातील पुरुष व महिलांसाठी आयोजित केली आहे.

स्पर्धेतून निवडलेले भंडारा जिल्हा संघ ५ जानेवारी २०२५ रोजी अमरावती येथे होणाऱ्या महाराष्ट्र राज्य क्रॉस कंट्री चॅम्पियनशिपमध्ये सहभागी होणार आहेत.

स्पर्धेसाठी नोंदणी करताना यूआयडी नंबर अनिवार्य असून, सहभागासाठी १०० रुपये प्रवेश फी आहे. आधारकार्ड झेरॉक्स आणि नगर परिषदेचा जन्म दाखला आवश्यक आहे.



अधिक माहितीसाठी श्याम देशमुख, जयंत तांडेकर, सुनील पंचबुद्धे, विष्णू निमसडे, प्रविण पिकलमुंडे, सुशांत बांडेबुचे, अश्विन सेलोकर, अमित मडावी, व सुनील गजभिये यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

**वयोगटानुसार पात्रता खालीलप्रमाणे आहे**

U-16: ३१ जानेवारी २००९ च्या आत जन्म.
U-18: ३१ जानेवारी २००७ च्या आत जन्म.
U-20: ३१ जानेवारी २००५ च्या आत जन्म.

**स्पर्धेतील क्रीडा प्रकार**

U-16: मुले व मुली २ किमी
U-18: मुले ६ किमी, मुली ४ किमी
U-20: मुले ८ किमी, मुली ६ किमी
– पुरुष व महिला: १० किमी

# कोल्हारमध्ये उपनगर व मार्ग नामफलकाचे अनावरण



**कोल्हार | प्रतिनिधी**

राहाता तालुक्यातील कोल्हार बुद्रुक येथे पद्मश्री विखे पाटील कारखान्याचे संचालक स्वप्निल निबे आणि महेश निबे यांनी त्यांच्या वडिलांच्या स्मृतीप्रित्यर्थ राजुरी रोड व तिसगाववाडी रोडला जोडणाऱ्या रस्त्याचे स्व. सुरेशराव निबे मार्ग आणि याच रस्त्यावरील विकसित नगराचे स्व. सुरेशराव निबे नगर असे नामकरण केले आहे.

सदर मार्ग व उपनगराच्या नामफलकाचे अनावरण जिल्हा परिषद अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील यांच्या हस्ते संपन्न झाले. या कार्यक्रमाला कोल्हार भगवतीपूर ग्रामस्थ, निबे पाटील मित्र परिवार, आणि आप्तेष्ट मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमामुळे गावातील सामाजिक वातावरण उत्साही बनले असून, स्व. सुरेशराव निबे यांच्या स्मृतींना आदरांजली अर्पण करण्याचा हा उपक्रम कौतुकास्पद ठरला आहे

# श्रीक्षेत्र दत्त संस्थान कोल्हारवाडी येथे आज भव्य दत्त जन्मोत्सव सोहळा

**बीड | प्रतिनिधि**

बीड शहराजवळील श्रीक्षेत्र दत्त संस्थान कोल्हारवाडी फाटा या ठिकाणी आज रविवार दि.१५ रोजी मोठ्या थाटात दत्त जन्मोत्सव साजरा केला जाणार आहे. दत्त संस्थानचे सर्वेसर्वा श्री ह भ प श्रीहरी महाराज पवार यांनी या दत्त जन्मोत्सव सोहळ्याचा लाभ घ्यावा असे आवाहन सर्व भाविक भक्ताला केले आहे.. सकाळी सात वाजता श्री च्या मूर्तीचां महा अभिषेक होणार आहे, तर सकाळी आठ ते दहा या वेळेत छत्रपती संभाजी चौक – मंदिर भव्य शोभायात्रा निघणार आहे.. दुपारी अकरा ते एक या वेळेत दत्त जन्माचे कीर्तन व काल्याचे किर्तन श्री ह भ प महंत संजीवन दास महाराज पाटील यांचे होईल. त्यानंतर महाप्रसादाचे वाटप होणार आहे.. या सर्व कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन दत्त जन्मोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.. विशेष उद्या रात्री सात ते नऊ या वेळेत दत्तप्रभूंच्या पालखीचे भव्य मिरवणूक निघणार आहे या मिरवणुकीमध्येही सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे..

# शिक्षकांच्या कार्योत्तर मान्यता देण्याचे उच्च न्यायालयाचे माध्यमिक शिक्षणाधिकारी यांना आदेश

**सोलापूर | प्रतिनिधी**

करमाळा तालुक्यातील श्री दत्त बहुउद्देशीय संस्थेच्या संस्थाचालकांनी शाळेच्या स्थापनेपासून शिक्षकांकडून काम करून घेतले परंतु शिक्षण विभागाच्या मान्यता घेतल्या नाहीत. यामुळे उच्च न्यायालयात याचिका दाखल केलेल्या शिक्षकांच्या बाजूने न्यायालयाने आदेश देऊन सोलापूर जिल्हा परिषदेचे माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांना दोन महिन्यात याचिकेतील शिक्षकांना कार्योत्तर मान्यता देण्याचे कामकाज पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत.



श्री दत्त बहुउद्देशीय संस्था शेलगाव ता. करमाळा या शैक्षणिक संस्थेअंतर्गत सन २००२ मध्ये श्री अवधूत विद्यालय वांगी नं-२ ही विनाअनुदानित शाळा सुरू करण्यात आली या माध्यमिक शाळेत शिक्षक व शिपाई म्हणून सेवा केलेल्या पाच कर्मचाऱ्यांना संस्थेने सन २००८-०९ मध्ये नियुक्ती देऊन शिक्षण विभागाकडून वैयक्तिक मान्यता घेतल्या. यानंतर या शाळेतील पाच कर्मचाऱ्यांनी त्यांच्या विनाअनुदानित काळातील मान्यता मिळाव्यात याकरिता वारंवार शिक्षणाधिकारी व उपसंचालक यांच्या कार्यालयाकडे तक्रारी दिलेल्या होत्या. शिक्षणाधिकारी व उपसंचालक यांनी संस्थेला लेखी आदेश दिलेले असताना संस्थेने शिक्षकांचे कार्योत्तर मान्यता प्रस्ताव मान्यतेसाठी पाठवले नाही. यामुळे या शाळेतील शिक्षकांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. या याचिकेचा निकाल सन २०१६ मध्ये शिक्षकांच्या बाजूने लागला. उच्च न्यायालयाच्या निकालानंतर देखील शिक्षण विभाग व संस्था यांच्याकडून कार्योतर मान्यता देण्याबाबत दप्तर दिरंगाई करण्यात आली. याचिका कर्त्यांना निरंतर प्रतीक्षेत ठेवण्यात आले. शिक्षण विभागाकडून संस्थेवर कोणतीही कारवाई झाली नाही. त्यामुळे उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचा अवमान झाल्याने शिक्षकांच्या वतीने उच्च न्यायालयात ऑक्टोबर २०२४ मध्ये अवमान याचिका दाखल करण्यात आली.

२२ नोव्हेंबर २०२४ रोजी उच्च न्यायालय मुंबई यांनी अवमान याचिकेचा निकाल दिला आहे. या निकालात माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी शाळेतील शिक्षक व शिपाई यांच्या कार्योतर मान्यता ६० दिवसात पूर्ण करून देण्याचे आदेश दिले आहेत. अवमान याचिकेवरील सुनावणीत न्यायालयाने संस्था व शिक्षण विभाग यांच्या निष्काळजीपणावर ताशेरे ओढले आहेत व दुसऱ्यांदा न्यायालयाचा अवमान होणार नाही याची खबरदारी घेण्याची तंबी दिली आहे.

शिक्षकांच्या वतीने पुणे येथील ज्येष्ठ विधीज्ञ राजाराम देशमुख यांनी काम पाहिले.

# सक्सेस कॉम्पुटर एज्युकेशन सेंटरला विदर्भ बेस्ट परफॉर्मर पुरस्काराने गौरव

**मुल | प्रतिनिधी**

महाराष्ट्र ज्ञान महामंडळ, पुणे यांच्या वतीने नागपूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल कन्व्हेन्शन सेंटर, कामठी रोड येथे आयोजित विभागीय बैठकीत मुल येथील सक्सेस कॉम्प्युटर एज्युकेशन सेंटर संस्थेला मानाचे तीन पुरस्कार मिळाले. ३२ वर्षांपासून कार्यरत असलेल्या या संस्थेचे संचालक नितीन येरोजवार यांना एमएस-सीआयटी व केएलआयसीसाठी सर्वाधिक प्रवेश, विदर्भ ईस्ट बेस्ट परफॉर्मर, आणि १००० क्लब अवॉर्ड २०२४ अशा तीन प्रतिष्ठित पुरस्कारांनी गौरवण्यात आले.




कार्यक्रमात एमकेसीएलच्या मॅनेजिंग डायरेक्टर डॉ. विना कामत, सिनियर जनरल मॅनेजर अतुल पतोडी, अमित रानडे, नटराज कटकधोंड, नागपूर विभागीय समन्वयक शशिकांत देशपांडे, रिजनल मॅनेजर दया कटरे, आणि चंद्रपूर जिल्हा समन्वयक लक्ष्मीकांत कांबळे उपस्थित होते. याशिवाय नागपूर विभागातील सर्व जिल्ह्यांचे समन्वयक आणि संगणक प्रतिनिधीही या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

सक्सेस कॉम्प्युटर एज्युकेशन सेंटरच्या या यशाने विदर्भात गौरवाचा क्षण निर्माण केला असून, या पुरस्कारांमुळे संस्थेच्या गुणवत्तापूर्ण कार्याची दखल घेतली गेली आहे.

# ज्ञानेश्वर साखर कारखान्याने गाठला दोन लाख टन ऊस गाळपाचा टप्पा

**अहिल्यानगर | प्रतिनिधी**

लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखरकारखान्याचा गळीत हंगाम १५ नोव्हेंबरपासून सुरू झाला. विधानसभा निवडणुकीमुळे पुरेसे ऊस तोडणी मजूर उपलब्ध न झाल्याने सुरुवातीला प्रतिदिन ऊस पुरवठा व गाळपाचे प्रमाण कमी होते.मत मोजणीनंतर मात्र ऊसतोड व गाळपाला गती मिळाली आहे. कारखान्याने १२ डिसेंबरपर्यंतच्या २७ दिवसांमध्ये एकूण २ लाख ९६० मेट्रिक टन ऊस गाळप करून १ लाख ४८ हजार १०० क्विंटल साखर निर्मिती केली आहे. कारखान्याचे अध्यक्ष माजी आ. नरेंद्र घुले पाटील यांनी ही माहिती दिली.



कार्यकारी संचालक अनिल शेवाळे यांनी सांगितले की, अध्यक्ष व माजी आ. नरेंद्र घुले पाटील, संचालक व माजी आ.चंद्रशेखर घुले पाटील, उपाध्यक्ष माजी आ. पांडुरंग अभंग, देसाई देशमुख व संचालक मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली प्रतिदिन ९००० ते ९५०० मेट्रिक टन उसाचे गाळप होईल, अशी यंत्रणा कार्यरत आहे. कारखान्याने आतापर्यंत २० लाख लीटर इथेनॉलची निर्मिती केली आहे. येथील ३१.५ मेगावॉट सहवीज निर्मिती प्रकल्पा मधून २५ दिवसांत १ कोटी २२ लाख १२ हजार ३७६ युनीट वीज निर्मिती झाली. आतापर्यंत ६५ लाख ६३ हजार ७४० युनिट वीज निर्यात केली आहे. कारखान्याच्या इथेनॉल प्रकल्पामधून बी - हेव्ही मोलॅसेसपासून २४ दिवसांत १७ लाख ०८ हजार ६५७ लीटर तर सिरपपासून ३ लाख ६० हजार ०३४ लीटर अशी २०,७८,६९१ लीटर इथेनॉलची निर्मिती झालेली आहे.

# आमदार किशोर जोरगेवार यांचा महाराष्ट्र ऑटोरिक्षा चालकमालक संघटनेतर्फे सत्कार



**चंद्रपूर | प्रतिनिधी**

महाराष्ट्र ऑटोरिक्षा चालकमालक संघटनेच्या वतीने चंद्रपूर विधानसभेचे लोकप्रिय आमदार किशोर जोरगेवार यांचा जनसंपर्क कार्यालयात शाल, स्त्रीफळ आणि गुलदस्त्यांनी सत्कार करण्यात आला.

ऑटोरिक्षा संघटनेच्या सर्व प्रतिनिधींनी एकत्र येऊन हा सत्कार कार्यक्रम आयोजित केला. यावेळी ऑटोरिक्षा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजेंद्र खांडेकर, जिल्हाध्यक्ष मधुकर राऊत, जिल्हा सचिव सुनिल धंदरे, जिल्हा उपाध्यक्ष विनोद चन्ने, तसेच जहीर शेख, रवी आंबटकर, मंगेश चवरे, किशोर वाटेकर, रमेश वझे आणि इतर अनेक ऑटोरिक्षा चालक-मालक उपस्थित होते. कार्यक्रमामध्ये आमदार किशोर जोरगेवार यांनी ऑटोरिक्षा चालक-मालकांच्या विविध समस्यांबद्दल त्यांच्या समर्थनाची वचनबद्धता दिली. त्याचबरोबर संघटनेच्या विविध कार्यांची प्रशंसा केली आणि भविष्यात त्यांच्या हितासाठी आवश्यक पाऊले उचलण्याचे आश्वासन दिले.

# शिवपुराण कथेला उत्स्फूर्त प्रतिसाद







**पुलगाव | प्रतिनिधी**

स्थानिक गांधी नगर परिसरात सुरू असलेल्या शिवपुराण कथेला भक्तगणांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. सहाव्या दिवशी परमपूज्य राधेश्याम व्यास महाराज यांनी पार्वती आणि गंगेच्या तपश्चर्येची कथा सांगताना भक्तांना आध्यात्मिक संदेश दिला.

महाराजांनी सांगितले की, पार्वती आणि गंगा दोघीही कठोर तपासाठी गेल्या होत्या. नारद मुनिंनी गंगेला धार्मिक प्रवचन दिले, ज्यामुळे तिला शिवजींना प्राप्त करण्याची तीव्र इच्छा निर्माण झाली. पार्वतीला देखील नारदजींनी त्याच प्रकारे प्रेरणा दिली. यावेळी दुर्वासा ऋषींच्या आगमनामुळे घडलेल्या घटनांचे वर्णन करताना महाराजांनी संताप, शाप, आणि क्षमेच्या महत्त्वावर जोर दिला. गंगेला दुर्वासा ऋषींच्या शापातून पवित्र गंगेचा दर्जा कसा मिळाला याचे वर्णन करत महाराजांनी सांगितले की, गंगेच्या पाण्यात स्नान करणाऱ्यांना पवित्रता प्राप्त होते. भगवान शिवांनी गंगेला स्वतःच्या जटांमध्ये स्थान दिले, आणि तिच्या माध्यमातून मानवजातीच्या पापांपासून मुक्त होण्याचा मार्ग उघडला. या कथेस महिलांसह सर्व स्तरातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर हजेरी लावली. राधेश्याम महाराजांनी धर्म आणि धर्मग्रंथांचे महत्त्व अधोरेखित करत असे धार्मिक कार्यक्रम समाजात सनातन धर्म टिकवण्यासाठी आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. शिवपुराण कथेच्या माध्यमातून उपस्थित भक्तगणांनी अध्यात्म, भक्ती, आणि धर्माचे महत्त्व अनुभवले, ज्यामुळे परिसरात धार्मिक वातावरण निर्माण झाले आहे.

# जयहिंद लोकचळवळीच्या वतीने २१ ते २३ डिसेंबर काळात भव्य कला महोत्सवाचे आयोजन

**संगमनेर । प्रतिनिधी**

निरोगी व सुदृढ समाज निर्मितीसाठी कार्यरत असलेल्या जयहिंद लोकचळवळीच्या वतीने मा. शिक्षणमंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील विद्यार्थ्यांना व्यवसाय पूर्व कलाकौशल्याची संधी मिळावी याकरता २१ डिसेंबर ते २३ डिसेंबर २०२४ या काळामध्ये क्रीडा संकुल येथे भव्य कला महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे .यामध्ये ७२०० विद्यार्थ्यांचा समावेश असून हे सर्व विद्यार्थी एकाच वेळेस देशभक्तीपर गीतगायन करणार असल्याची माहिती जयहिंद लोकचळवळीचे संस्थापक मा.आमदार डॉ. सुधीर तांबे यांनी दिली आहे.

संगमनेर येथील प्रभा निवासस्थानी आयोजित पत्रकार परिषदेत या कला महोत्सवा बाबत त्यांनी माहिती दिली .यावेळी समवेत बालभारतीचे विशेष अधिकारी डॉ अजयकुमार लोळगे ,प्रकाश पारखे, डॉ. नामदेवराव गुंजाळ आधी सर्व पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. याबाबत अधिक माहिती देताना मा. आमदार डॉ तांबे म्हणाले की, जयहिंद लोकचळवळ ही निरोगी व सुदृढ समाज निर्मितीसाठी काम करत आहे. या अंतर्गत सातत्याने विविध उपक्रम राबवले जात असून विद्यार्थ्यांना व्यवसाय पूर्व कौशल्य मिळावे याकरता सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात क्रीडा संकुल येथे २१ डिसेंबर ते २३डिसेंबर २०२४ या काळामध्ये भव्य कला महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या कला महोत्सवाचे उद्घाटन शनिवार दिनांक २१ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ९ वाजता काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते माजी मंत्री बाळासाहेब थोरात, मा. आ.डॉ सुधीर तांबे व आमदार सत्यजित तांबे, कॅन्सरतज्ञ डॉ. जयश्रीताई थोरात यांच्या उपस्थितीत होणार आहे. या कला महोत्सवात विविध प्रकारची २० स्टॉल असून यामधून विद्यार्थ्यांना ओरिगामी, पेपर क्विलिंग ,नारळाची करवंटी ,बुरुडकाम, पतंग तयार करणे, कॅनव्हास पेंटिंग, निसर्ग चित्र, जलतरंग ,कागदी फुलांची निर्मिती, स्क्रीन प्रिंटिंग, सौंदर्यप्रसाधने, पुष्पगुच्छ तयार करणे, रांगोळी रेखाटन, सायकल दुरुस्ती, प्रिंट मेकिंग, वारली, चित्रकला, मातीकाम, पपेट शो ,क्लास आर्ट, अक्षरलेखन, रस्ता सुरक्षा, फायर सेफ्टी, व्यसन बंदी, झुंबा, वारकरी, याचबरोबर संगणकीय प्रशिक्षण असे वेगवेगळे प्रकारचे कला कौशल्य शिकवले जाणार आहे. याकरता राज्यभरातून आणि देशभरातून तज्ञ व्यक्ती मार्गदर्शन करणार आहेत. या तीन दिवसाच्या कला महोत्सवात तालुक्यातील इयत्ता पाचवी ते नववीच्या विद्यार्थ्यांचा सहभाग राहणार असून या तीन दिवसात ७२०० विद्यार्थी कला कौशल्यांचे प्रशिक्षण घेणार आहे. या सर्व विद्यार्थ्यांना आयोजकांच्या वतीने साहित्य वाटप करण्यात येणार असून त्यांनी तयार केलेल्या वस्तू त्या विद्यार्थ्यांना स्वतःकडे घेऊन जाता येणार आहे. यानंतर हे सर्व ७ हजार विद्यार्थी एक ताल एक सुरात बलसागर भारत होवो, सारे जहाँ से हिंदुस्तान हमारा, आणि उधळीत शीत किरणा हे तीन देशभक्तीपर गीते एकाच वेळेस सादर करणार असल्याचे प्रकाश पारखे यांनी सांगितले. तरी या भव्य दिव्य कला महोत्सवात संगमनेर तालुक्यातील सर्व शाळांनी सहभाग नोंदवावा तसेच अधिक माहितीसाठी प्रकाश पारखे याचेशी संपर्क करावा असे आवाहन जयहिंद लोकचळवळीच्या वतीने करण्यात आले आहे.

### पारगाव येथे कुस्तीचा थरार

# श्रीगोंदा तालुका केसरीचा किताब विशाल पवार यांना

**श्रीगोंदा । प्रतिनिधी**

येथे श्रीगोंदा तालीम संघाच्या वतीने आयोजित कुस्ती स्पर्धेत येळपणा येथील पैलवान विशाल पवार यांनी श्रीगोंदा तालुका केसरीचा किताब पटकावला. या स्पर्धेत १५० हून अधिक कुस्त्या चुरशीने झाल्या, ज्यामुळे प्रेक्षकांना रोमांचक अनुभव मिळाला.




२० वर्षांपासून बंद असलेल्या या कुस्ती स्पर्धेचे पुनरुज्जीवन होताना अनेक नामवंत पैलवानांनी सहभाग नोंदवला. या निमित्ताने कुस्ती शौकीनांसाठी आनंदाचा क्षण ठरला. स्पर्धेचे आयोजन माजी सरपंच गोविंद मोटे यांच्या स्मरणार्थ करण्यात आले होते, ज्यामध्ये विजेत्यासाठी चांदीची गदा ठेवण्यात आली होती.

स्पर्धेच्या यशस्वितेसाठी पैलवान नितिन मोरे, संदीप बारगुजे, अक्षय कोठारी यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी माजी सरपंच गोविंद मोटे यांचे पुतणे, तसेच अनेक सामाजिक कार्यकर्ते, आणि गावातील मान्यवरांनी तन, मन, धन अर्पण करून या उपक्रमाला पाठिंबा दिला. कार्यक्रमाला जेष्ठ पत्रकार नंदकुमार बगाडेपाटील, शिवाजी दानवेपाटील, बाळासाहेब मोरे, बंडू मोटे, राजेंद्र कोठारी, दीपक ऐरडे, पोपट मोरे, गोरख कदम, जालंधर

# ज्या देशात परिवारात स्त्रियांची पूजा होते,तिथे सुख नांदते–ह.भ.प.दादा महाराज रंजाळे

**श्रीरामपूर । प्रतिनिधी**

श्रीकृष्ण हे अहिंसा, प्रेम, भक्ती, वीरत्व आणि संस्कृतीचे प्रतीक आहे. त्यांचे जीवनचरित्र सर्वश्रेष्ठ आहे. त्यांनी बलाढ्य क्रूरतेला हरवले आणि प्रेमाचे जग निर्माण केले.आई, गवळणी, निराधार महिला, भक्तगण यांचे रक्षण केले.

सर्वसामान्य माणसाला जवळ केले.त्यांनी दूध, दही,लोणी,तूप खाऊन शरीर,मन बलिष्ठ केले. त्यामुळेच ज्या देशात, कुटुंबात स्त्रियांची, गाईंची पूजा, सुरक्षा आणि सन्मान होतो तो देश,परिवार पावन, पवित्र,समाधानी होतो.असे विचार ह.भ.प.दादा महाराज रंजाळे यांनी व्यक्त केले. श्रीरामपूर येथील इंदिरानगर भागातील श्रीदत्त मंदिरात आयोजित श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञात बोलत होते. बाबासाहेब यादव, लताताई यादव, योगेश यादव, ज्ञानेश्वरमाऊली मुरकुटे, डॉ. बाबुराव उपाध्ये, पत्रकार ॲड बाळासाहेब तनपुरे, ज्योतीताई तोडमल, मुख्याध्यापक भागवत मुठे पाटील,दादासाहेब पटारे आदिंनी रंजाळे महाराजांचे स्वागत, संतपूजन केले. रंजाळे महाराजांनी तीन तासांच्या भागवतकथा विवरणात मथुरालीला, द्वारकालीला, श्रीकृष्ण–रूक्मिणी विवाह सोहळा प्रसंग अत्यंत प्रभावीपणे सादर केले. कंसाच्या पापाचा अतिरेक झाला म्हणून श्रीकृष्णाने त्याचा अंत केला. सत्तेचा आणि द्वेष भावनेचा अतिरेक झाला की जगाच्या रक्षणासाठी त्यांचा शेवट केला पाहिजे.१४ वर्षे आई,बापांपासून विरह दुःख सहन करून श्रीकृष्णाने प्रेम आणि हसून जीवन व्यतीत केले. वेदना आणि प्रार्थना जो अनुभवतो, तो देव होतो. जेथे प्रेम, विश्वास, भक्ती, निर्मळमन आणि सत्य तेथे विजय मिळतो, समाधान सापडते, असे विचारसूत्र अनेक प्रसंगातून रंजाळे महाराजांनी जणू साक्षात उभे केले.



# श्री हनुमान विद्यालय अवसरीच्या वक्तृत्व स्पर्धेत तालुका स्तरावर प्रथम क्रमांक

**इंदापूर । प्रतिनिधी**

पुणे जिल्हा परिषद व इंदापूर पंचायत समिती यांच्या वतीने आयोजित ५२ व्या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन व स्पर्धांमध्ये श्री हनुमान विद्यालय, अवसरीने उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

डॉ. कदम गुरुकुल, इंदापूर येथे पार पडलेल्या या विज्ञान प्रदर्शनात तालुक्यातील अनेक शाळांनी सहभाग नोंदवला होता. या कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते झाले. तीन दिवस चाललेल्या या प्रदर्शनात विविध शाळांनी विज्ञान विषयक प्रकल्प सादर केले. याशिवाय प्रश्नमंजुषा आणि वक्तृत्व स्पर्धांचे आयोजनही करण्यात आले होते.



वक्तृत्व स्पर्धेत श्री हनुमान विद्यालय, अवसरीचा साजिद शकील शेख याने मोठ्या गटात प्रथम क्रमांक पटकावला. प्रश्नमंजुषा स्पर्धेत प्रतीक्षा जाधव, आरती गायकवाड, शाहिद शेख, आणि महेश कांबळे यांनी तिसरा क्रमांक मिळवून विद्यालयाच्या यशात मोलाची भर घातली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश संपूर्ण परिसरात कौतुकाचा विषय ठरला आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांचा सन्मान विद्यालयाचे चेअरमन अरुणदादा शिंगटे, सचिव विजया शिंगटे, मुख्याध्यापक प्रवीण लोंढे, आणि इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत करण्यात आला. या विद्यार्थ्यांना विज्ञान शिक्षक नाना घळके यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

श्री हनुमान विद्यालयाने तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात मिळवलेल्या या घवघवीत यशामुळे शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेचा नवा आदर्श उभा राहिला आहे

# सोलापूरमध्ये एम्स रुग्णालयासाठी खासदार प्रणिती शिंदे यांची मागणी;राज्य सरकार देणार सहकार्य

**माळशिरस । प्रतिनिधी**

सोलापूरच्या आरोग्य क्षेत्रात बदल घडवून आणण्यासाठी खासदार प्रणिती शिंदे यांनी एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. सोलापूरमध्ये अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थान (एम्स) उभारण्यासाठी त्यांनी केंद्रीय आरोग्य मंत्री जगत प्रकाश नड्डा यांना पत्र पाठवले आहे. त्यांनी आपल्या पत्राद्वारे सोलापूरच्या भौगोलिक आणि सामाजिक परिस्थितीचा विचार करून येथे एम्स उभारण्याची गरज अधोरेखित केली आहे.

खासदार शिंदे यांनी नमूद केले की सोलापूर जिल्ह्यासह परिसरातील नागरिकांना अद्ययावत आणि उच्च दर्जाच्या आरोग्य सेवांची मोठी गरज आहे. शहरातील लोकसंख्या घनता, ग्रामीण भागातील आरोग्य सुविधांचा अभाव आणि विविध आजारांवरील उपचारांसाठी होणारी अडचण लक्षात घेता, सोलापूर एम्ससाठी योग्य ठिकाण ठरू शकते.



त्यांनी सोलापूरच्या सांस्कृतिक, औद्योगिक, आणि शैक्षणिक महत्त्वाकडेही लक्ष वेधले. या मागणीमुळे परिसरातील लाखो नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा मिळण्याचा मार्ग सुकर होईल. शिंदे यांनी आपल्या पत्रात हेही स्पष्ट केले की महाराष्ट्र सरकार एम्स प्रकल्पासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्यास तयार आहे. त्यामुळे केंद्र सरकारने सकारात्मक निर्णय घेतल्यास प्रकल्प साकारण्यास अडथळा राहणार नाही. खासदार पदाची जबाबदारी सांभाळत प्रणिती शिंदे यांनी सोलापूरच्या विकासासाठी विविध उपक्रम राबवले आहेत. विमानतळ विकास, रेल्वे सेवा विस्तार, आणि शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी त्यांनी दिल्लीत प्रभावी पाठपुरावा केला आहे. एम्सच्या स्थापनेची मागणी हा त्यांच्या याच धडपडीचा एक भाग आहे. गेल्या काही वर्षांत सोलापूरच्या विकासात आलेली ठिसूळ स्थिती दूर करण्यासाठी शिंदे यांच्या प्रयत्नांवर सोलापूरकरांनी विश्वास व्यक्त केला आहे. एम्स प्रकल्पासाठी केंद्र सरकारकडून सकारात्मक निर्णय होईल, अशी आशा स्थानिकांनी व्यक्त केली आहे.

# आंतरराष्ट्रीय विज्ञान महोत्सवात रजनी चिलबुले यांची दुसऱ्यांदा निवड

**तळोधी (बा) ।प्रतिनिधी**

आयआयटी गुवाहाटी (आसाम) येथे आयोजित १० व्या भारत आंतरराष्ट्रीय विज्ञान महोत्सवात (आय आय एस एफ ) कर्मवीर विद्यालय, नागभीडच्या विज्ञान शिक्षिका रजनी सुधाकर चिलबुले यांची दुसऱ्यांदा निवड झाली आहे. वैज्ञानिक गुणवत्तेच्या आधारे मिळालेल्या या यशामुळे त्यांनी संस्थेचा आणि स्थानिक परिसराचा गौरव वाढवला आहे.



या मेगा विज्ञान महोत्सवात २४ प्रकारचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले, ज्यामध्ये ७,००० प्रतिनिधी आणि ४५,००० लोक सहभागी झाले होते. यावेळी चंद्राच्या १० मीटर उंच प्रतिकृतीचे प्रदर्शन हे मुख्य आकर्षण ठरले. तसेच, सागरिका: द टेल ऑफ अर्थ सायन्स या इव्हेंटद्वारे पर्यावरणीय समस्यांवर जनजागृती करण्यात आली.

गुरुकुला या वर्कशॉपसाठी भारतभरातून १५० विज्ञान शिक्षकांची निवड करण्यात आली होती, ज्यामध्ये रजनी चिलबुले यांचा समावेश होता. त्यांनी आपल्या प्रतिपादनात सांगितले की, या वर्कशॉपमुळे विद्यार्थ्यांना वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्यास नक्कीच मदत होईल.


त्यांच्या यशाबद्दल डाएट प्राचार्य हिवारे , संस्थेचे सचिव जनवार , संचालिका जनवार मॅडम, मुख्याध्यापक चिलबुले सर यांसह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

आयआयएसएफ च्या माध्यमातून भारतातील शास्त्रज्ञ, संशोधक, आणि संस्थांमध्ये जागतिक पातळीवर संवाद आणि सहयोग वाढवणे, तसेच विज्ञानाचे सोपे स्वरूप जनसामान्यांपर्यंत पोहोचवणे हा महत्त्वाचा उद्देश ठेवण्यात आला होता. रजनी चिलबुले यांच्या या उल्लेखनीय यशामुळे विज्ञान शिक्षणाच्या क्षेत्रात नव्या संधी आणि प्रेरणा निर्माण होणार आहे

# लोकनेते गोपीनाथ मुंडे जयंती निमित्त सुरज धात्रकांचा सत्कार

**वरोरा ।प्रतिनिधी**

वंजारी सेवा परिषदेच्या वतीने दरवर्षी लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या जयंतीनिमित्त विविध सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. यावर्षी देखील वरोरा येथे जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात भाजपा युवा मोर्चा तालुका अध्यक्षपदी नुकतीच निवड झालेल्या सुरज धात्रक यांचा सत्कार करण्यात आला. सुरज धात्रक यांनी नागरी भागातील विविध समस्यांवर प्रश्न उपस्थित करून माध्यमांचे लक्ष वेधले आहे. त्यांच्या समाजकार्याची दखल घेत व तालुका अध्यक्षपदी निवड झाल्यामुळे त्यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वंजारी सेवा परिषदेचे अध्यक्ष आणि माजी नगरसेवक प्रमोद काळे होते. भद्रावती नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी कु. शेळके मॅडम,



खांबाळा गावचे सरपंच शेळके साहेब, तसेच बांगर सर, अशोक धात्रक, नगाजी साळवे, प्रमोद रामने, अनिल चांगले आणि अन्य मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित होते.

कार्यक्रमामध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आणि समाजासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा गौरव करण्यात आला. वंजारी सेवा परिषदेच्या या उपक्रमामुळे सामाजिक सलोखा वृद्धिंगत होण्यास मदत होत असल्याचे उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

# बनावट देशी दारू प्रकरणात मोठी कारवाई;आरोपी अटकेत

**गंगापूर । प्रतिनिधी**

गंगापूर तालुक्यातील मांजरी गावात राज्य उत्पादन शुल्क विभागाने छापा टाकून मोठ्या प्रमाणावर बनावट देशी दारूचा साठा आणि उत्पादनासाठी लागणारे साहित्य जप्त केले. १२ डिसेंबर रोजी गुप्त माहितीच्या आधारे झालेल्या कारवाईत १ लाख २५ हजार ३७५ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, आरोपी राहुल काशीनाथ गायकवाड (रा. मांजरी, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर) याला अटक करण्यात आली आहे.



कारवाईत देशी दारू भींगरी संत्रा ब्रँडच्या ९६ बनावट सिलबंद बाटल्या, बॉटल सीलिंग मशीन, नवीन २५० बॉटल सील्स, १५ लिटर मद्यार्क, ८५० रिकाम्या बाटल्या, मोबाईल, आणि इतर साहित्याचा समावेश आहे. आरोपीने बनावट देशी मद्य तयार करून विक्रीचा उद्देश असल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट झाले आहे.

आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ अंतर्गत कलम ६५ (ब, ड, ई, फ), ८१, ९०, १०८ आणि बीएनएस अधिनियमाच्या कलम १२३ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर कारवाईत प्र. निरीक्षक तथा उप–अधीक्षक गुणाजी क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली दुय्यम निरीक्षक ए.ई. तातळे, एल.बी. माटेकर, डि.एस. सूर्यवंशी आणि जवान एम.एस. मुजमुले, एच.ए. बारी, संतोष महाले, के.जी. मोटे, कुंदा कोरडे, शीतल बागडे, व वाहनचालक शिवशंकर मूपडे यांनी सहभाग घेतला.

सदर प्रकरणाचा पुढील तपास दुय्यम निरीक्षक ए.ई. तातळे (राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक, जि. छत्रपती संभाजीनगर) करीत आहेत.

ही कारवाई झाल्यामुळे बनावट मद्य विक्री व उत्पादन करणाऱ्यांविरोधात पोलिसांचे मोठे पाऊल उचलले गेले असून, यामुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

# न्यायाधीश धनंजय निकम यांचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला

**सातारा । प्रतिनिधी**

पाच लाख रुपयांच्या लाचप्रकरणी अडचणीत आलेल्या जिल्हा व सत्र न्यायाधीश धनंजय निकम यांच्या अटकपूर्व जामीन अर्जावर शुक्रवारी सुनावणी झाली. या प्रकरणातील गंभीरता लक्षात घेता जिल्हा न्यायालयाने त्यांचा अर्ज फेटाळून लावला आहे. धनंजय निकम यांच्यासह आनंद मोहन खरात (रा. दहीवडी, ता. माण), किशोर संभाजी खरात (रा. वरळी, मुंबई), आणि अन्य एका व्यक्तीवर लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणात एका युवतीने तक्रार दाखल केली होती, ज्यात जामीन मंजूर करण्यासाठी पाच लाख रुपयांची मागणी झाल्याचा उल्लेख आहे. सरकारी वकील महेश कुलकर्णी यांनी न्यायालयात युक्तिवाद करताना नमूद केले की, या प्रकरणात धनंजय निकम आणि अन्य आरोपींच्या संभाषणांचे ऑडिओ रेकॉर्डिंग उपलब्ध असून, त्यांचे मागील सहा



महिन्यांतील सुमारे नऊ तासांचे फोनवर संभाषण तपासात उघड झाले आहे. या रेकॉर्डिंगचा तपास आणि आवाजाच्या नमुन्यांसाठी धनंजय निकम यांना ताब्यात घेणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

बचाव पक्षाचे वकील विकास पाटील शिरगावकर यांनी निकम यांना अटक होऊ नये यासाठी युक्तिवाद केला. तथापि, सरकारी वकील यांनी सादर केलेले पुरावे आणि प्रकरणातील गंभीरता पाहता न्यायालयाने सरकारी पक्षाचा युक्तिवाद मान्य केला.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश व्ही.आर. जोशी यांनी लाच प्रकरणातील गंभीरता लक्षात घेत, समाजात चुकीचा संदेश जाऊ नये म्हणून अटकपूर्व जामीन फेटाळून लावला. आरोपी सध्या फरार आहेत, आणि पुढील तपास पुण्याच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत सुरू आहे.

# जनतेच्या मनातील अपेक्षा पूर्ण करण्याला आमचे प्राधान्य-ना.विखे पाटील

**राहुरी | प्रतिनिधी**

राज्यातील जनतेन महायुती सरकारला मोठे पाठबळ दिले आहे. जनतेच्या मनातील अपेक्षा पूर्ण करणे हेच आमचे प्राधान्य असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलेल्या शंभर दिवसांच्या कृती कार्यक्रमाची यशस्वी अंमलबजावणी करण्याचे उद्दिष्ट आम्ही पूर्ण करणार असल्याची माहिती ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

नागपूर अधिवेशनासाठी रवाना होण्यापुर्वी ना. विखे पाटील यांनी श्रीक्षेत्र निझर्णेश्वर येथे महादेवाचे दर्शन याप्रसंगी आमदार अमोल खताळ, प्रवरा बँकेचे व्हा. चेअरमन मच्छिंद्र थेटे, संचालक रामभाऊ भुसाळ, तहसिलदार धीरज मांढरे, गटविकास अधिकारी अनिल नागणे, पोलीस उपअधिक्षक कुणाल सोनवणे आदि याप्रसंगी उपस्थित होते. याआधी लोणी बुद्रुकचे ग्रामदैवत श्री म्हसोबा महाराजांच्या यात्रोत्सवात त्यांनी ग्रामस्थांसमवेत सहभागी होवून दर्शन घेतले. यात्रेनिमित काढण्यात येणाऱ्या काठीची विधीवत पूजा ना. विखे पाटील आणि डॉ. सुजय विखे पाटील यांच्या हस्ते करून मिरवणूक काढण्यात आली.

माध्यमांशी संवाद साधताना ना. विखे पाटील म्हणाले की, राज्यातील जनतेन महायुतीला मोठा प्रतिसाद दिला. याचे एकमेव कारण म्हणजे मागील अडीच वर्षात सरकारने घेतलेले महत्वपूर्ण निर्णय आहे. आमचे नेते देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री पदाचा कार्यभार स्विकारल्या नंतर राज्याला पुढे कसे घेवून जायचे याबबात निर्णय घेण्यास प्रारंभ केला आहे. प्रत्येक विभागासाठी शंभर दिवसांचा कृती आरखडा तयार करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या असून तोच आमचा प्राधान्यक्रम भविष्यात असल्याचे ना. विखे पाटील म्हणाले.

अहिल्यानगर जिल्ह्यातील औद्योगिक वसाहतीमध्ये नवे उद्योग आणून युवकांना रोजगार निर्माण करून देणे हा माझा प्राधान्यक्रम असणार आहे. यासाठी जिल्ह्याचा औद्योगिक विकास आराखडा तयार करण्यात आला असून त्यावर काम सुरू करायचे आहे. पुण्यशलोक अहील्यादेवी होळकर यांच्या जयंती दिनाला यंदा तिनशे वर्ष पूर्ण होत आहेत. त्यांचे राष्ट्रीय स्मारक उभारायचे हे उद्दीष्ट्य पूर्ण करायचे असून केंद्र व राज्य सरकारच्या सहकार्याने स्मारक उभारले जाणार असून त्याचा आराखडा तयार करण्यात आल्याची माहिती विखे पाटील यांनी दिली.

श्री क्षेत्र नेवासा येथे ज्ञानेश्वर सृष्टीची उभारणी, गोदावरी कालव्याचे नूतनीकरण आणि निळवंडे कालव्याचे राहीलेले काम पूर्णत्वास नेणे हाच आपला पुढील काही दिवसांचा यांनी असेल असेही विखे पाटील यांनी सांगितले.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत सहभागी झालेल्या महीलांच्या अर्जाची पडताळणी कुठेही सुरू नसल्याचे स्पष्ट करून महायुतीने जाहीरनाम्यात या योजनेचे अनुदान २१०० रुपये करण्याची ग्वाही दिली त्याची पूर्तता निश्चीत होईल असे विखे पाटील यांनी ठामपणे सांगितले.



## हनुमान मूर्ती विटंबना घटनेच्या निषेधार्थ पुणतांब्यात पाळला बंद

**अहिल्यानगर | प्रतिनिधी**

:अहिल्यानगर जिल्ह्यातील पुणतांबा हनुमान मूर्ती विटंबना घटनेच्या निषेधार्थ शनिवारी सकल हिंदू समाजाच्या वतीने पुणतांबाबंची हाक देण्यात आली होती दुपारपर्यंत व्यापाऱ्यांनी आपले सर्व व्यवहार बंद ठेवून बदला पाठिंबा दिला.

शुक्रवारी पहाटे रेल्वे स्टेशन समोरील हनुमान मूर्ती ची विटंबना झाल्याचे ग्रामस्थांच्या लक्षात आले होते ग्रामस्थ सकल हिंदू समाज मंदिराजवळ एकत्र येऊन झालेल्या घटनेचा निषेध व्यक्त केला होता रेल्वे पोलीस व जिल्हा पोलीस उपाधीक्षक शैलेश वमने यांनी घटनास्थळी धाव घेऊन जमावाला शांत करण्याचा प्रयत्न केला ग्रामस्थांच्या सहकार्याने विटंबना करणारा आरोपी पोलिसांनी पकडला त्यानंतर गावातील तणाव निवळला होता. झालेल्या घटनेच्या निषेधार्थ सकल हिंदू समाजाच्या वतीने पुणतांबा बंदचे आवाहन करण्यात आले होते त्याला




व्यापाऱ्यांनी प्रतिसाद देऊन बंदा पाठिंबा दिला. यावेळी पत्रकार चौकात निषेध सभा घेऊन पोलिसांना लेखी निवेदन देण्यात आले यावेळी कार्यकर्त्यांनी गावात अनेक मंदिरात जुगार पत्त्याचे डाव अवैध धंदे सुरू असून त्याचा बंदोबस्त करावा कार्यकर्त्यांनी यावेळी पोलिसांकडे केली यावेळी रात्रीचे पोलीस निरीक्षक गलांडे यांनी याचा बंदोबस्त केला जाईल अशी आश्वासन ग्रामस्थांना दिले

## आश्वी बु येथे दत्त जयंती निमित्ताने गुरुचरित्र पारायण पारायणास ५० हुन अधिक महिला पुरूष सेवेकरी

**राहुरी | प्रतिनिधी**

अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरूपीठ दिंडोरी प्रणित आश्वी बु तालुका संगमनेर येथे दि ९ ते १६ पर्यत गुरूमाऊली अण्णासाहेब मोरे व गुरूपुत्र चंद्रकांतदादा मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली श्री दत्त जयंती निमित्याने गुरूचरित्र पारायण व यज्ञ याग सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यात ५० हून अधिक पुरूष व महिला सेवेकरी गुरूचरित्र पारायणात सहभागी झालेले आहेत. श्री गुरूदेव दत् नामाचा जयघोष करत पारायाणाची सुरूवात करण्यात आली. यात ग्रामदेवता सन्मान,मंडल मांडणी व आग्नी स्थापना करून स्थापित देवताचे हवन करण्यात आले.या पारायणस १०० हून अधिक महिला पुरूष सेवेकरी २४ तास पहारा केत आहे.यामध्ये माळ जप करणे, विना धारण करणे तसेच स्वामी चरित्र वाचन केले जाते.गुरूचरित्र पारायण करणारी व्यक्ती ही खपु भाग्यवान असेत. श्री गुरूचरित्र या ग्रंथाचे ५२ अध्याय असुन ओवी संख्या ७४९१ इतकी आहे.त्याची विभागमी ज्ञानकांड, कर्मकाण्ड,भक्ति काण्ड यांचा समन्वय यात साधला अतून या तीन ही उपासनांसाठी गुरूचे मार्गदर्शनच कसे आवश्यक आहे यांचे वर्णन यामध्ये केले आहे.



# वाल्मीक अण्णा कराड यांच्या वर खोट्या गुन्ह्यांचा निषेध


## सर्व समाजबांधवांचे एकत्र येऊन प्रशासनाला निवेदन

**पाथर्डी | प्रतिनिधी**

परळी नगरपरिषदेचे गटनेते व सामाजिक कार्यकर्ते वाल्मीक अण्णा कराड यांच्यावर राजकीय आकसातून खोटे गुन्हे दाखल केल्याचा आरोप करत आज सर्व जाती-धर्मांच्या समाजबांधवांनी पाथर्डी पोलीस स्टेशन येथे जाऊन प्रशासनाला निवेदन दिले.

या प्रसंगी मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या नागरिकांनी निषेध व्यक्त करत प्रशासनाने खोट्या गुन्ह्यांची तात्काळ दखल घ्यावी आणि गुन्हे मागे घ्यावेत, अशी मागणी केली. मा. पोलीस निरीक्षकांना देण्यात आलेल्या निवेदनात हे गुन्हे अन्यायकारक आणि राजकीय दुजाभावातून प्रेरित असल्याचे नमूद करण्यात आले.

यावेळी समाजातील विविध क्षेत्रांतील प्रतिनिधींनीही या प्रकरणात आपला पाठिंबा दर्शवला. प्रशासनाने या प्रकरणाची योग्य दखल घेतली नाही, तर आम्ही पुढील तीव्र आंदोलन करू, असा इशाराही नागरिकांनी दिला.



या घटनेने परळीसह परिसरात चर्चेला उधाण आले असून, प्रशासनाच्या पुढील कृतीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## स्वयंसिध्दा यात्रा तालुकास्तरीय महीला बचत गटांचे प्रदर्शन



**अहिल्यानगर | प्रतिनिधी**

अहिल्यानगर जिल्यातील लोणी येथील जनसेवा फौडेशन, कृषी विज्ञान केंद्र,महाराष्ट्र शासन कृषी व पशुसंवर्धन विभाग पंचायत समिती यांच्या संयुक्त विद्यमाने लोणी येथे स्वयंसिध्दा यात्रा तालुकास्तरीय महीला बचत गटांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे.

प्रदर्शनात महीला बचत गटांनी उत्पादित केलेले अनेक स्टॉल्स उभारण्यात आले असून कृषि विभागाच्या वतीने शेतकर्याना नव्या वाणांची माहीती मिळणार आहे.

प्रदर्शनाच्या निमित्ताने महीला बचतगट तसेच विविध योजनेतील लाभार्थीना प्रमाणपत्र तसेच धनादेशाचे वितरण करण्यात आले. यावेळी माजी मंत्री मा.आण्णासाहेब म्हस्के पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ शालिनी विखे पाटील, डॉ सुजय विखे यांनी जिल्हा अधिक्षक कृषि आधिकारी सुधाकर बोराळे,तहसिलदार अमोल मोरे,पशुसंवर्धन विभागाचे डॉ तुंभारे,उपविभागीय कृषी अधिकारी गायकवाड आदी उपस्थित होते.


## 'एक देश,एक निवडणूक' विधेयकाला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी

**अहिल्यानगर | प्रतिनिधी**

केंद्रीय मंत्रिमंडळाने 'एक देश, एक निवडणूक' हे धोरण राबविण्यासाठी माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती. या समितीचा अहवाल केंद्रीय मंत्रिमंडळाने सप्टेंबर महिन्यात स्वीकारला होता. त्यानंतर केंद्रीय मंत्रिमंडळाने या विधेयकाला मंजुरी दिली आहे. त्यानंतर आता पुढील आठवड्यात हे विधेयक संसदेत सादर केले जाण्याची शक्यता आहे. केंद्र सरकारने निवडणूक सुधारणांच्या दिशेने टाकलेले हे एक महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे.

गेल्या काही वर्षांपासून भाजप 'एक देश, एक निवडणूक' करण्यासाठी प्रयत्न करत आहे. भाजपने निवडणूक जाहीरनाम्यात यासंदर्भात आश्वासन दिले होते. त्यानंतर आता हे विधेयक केंद्र सरकारने काल झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजूर केले आहे. त्यामुळे एक देश, एक निवडणूक' पद्धत २०२८ पर्यंत अस्तित्वात आणण्यासाठी मोदी सरकारच्या वतीने प्रयत्न केले जाणार आहेत. माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद समितीने १८ हजार पृष्ठांचा अहवाल तयार केलेला आहे. ज्यावर २१ हजार दुरुस्त्या येऊन त्यापैकी ८० टक्के दुरुस्त्या या पद्धतीच्या बाजूने आहेत अशी समिती सांगते.

दरम्यान, माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीत आठ सदस्य होते. त्यात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह काँग्रेस नेता अधीर रंजन चौधरी, डीपीए नेता नेता गुलाब नबी आझाद, ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ हरीश साळवे यांचा समावेश होता. तसेच पंधराव्या वित्त आयोगाचे माजी अध्यक्ष एनके सिंह, लोकसभेचे माजी



महासचिव डॉ. सुभाष कश्यप आणि संजय कोठारी हे या समितीचे सदस्य होते. या समितीच्या ३७६ पृष्ठांचा संक्षिप्त अहवाल वेबसाईटवर देखील उपलब्ध आहे. या विधेयकावर संसदेच्या सध्या सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनात सरकार सर्वसमावेशक विधेयक आणण्याची शक्यता आहे. भाजपच्या लोकसभा निवडणुकीच्या जाहीरनाम्यामध्ये 'एक देश, एक निवडणुकी'च्या आश्वासनाचा समावेश होता.

# कुप्रथेवर माणुसकीचा विजय : 'अमाशी'

**अहिल्यानगर | प्रतिनिधी**

जोगतीण ही प्रथा ८०-९०च्या दशकात सर्रास गावोगावी पाहायला मिळायची. देवाशी लग्न लागलेली तरुण जोगतीण म्हणजे गावातील पारावरचा चर्चेचा विषय असायचा. गावातील घरोघरी जोगवा मागून पोट भरणाऱ्या जोगतिणीवर गावातल्या आंबट शौकिनांची कायम नजर असणार. त्यातून एखाद्याशी सूत जमल्यास जन्माला आलेल्या अपत्यावर मात्र कोणी हक्क सांगत नाही. त्या अपत्याच्या वाट्याला कायम अवहेलना येते. अशाच जोगतिणीच्या मतिमंद मुलीच्या वाट्याला आलेली व्यथा आणि तिला मदत करणाऱ्या सहृदयी पाटलाची कथा 'अमाशी' या नाटकाद्वारे मांडण्यात आली.



प्रा. डॉ. चं. वि. जोशी लिखित, प्रदीप रासकर व विद्या जोशी दिग्दर्शित केडगावच्या कल्पद्रुम फाउंडेशनतर्फे 'अमाशी' हे नाटक बुधवारी (ता. ११) रात्री राज्य नाट्य स्पर्धेच्या अहिल्यानगर केंद्रावर सादर करण्यात आलं. पडदा उघडताच एका गावातील वडाच्या झाडाखाली असलेली देवी नजरेस पडते. देवीशेजारी अंगावर घोंगडी लपेटलेली पाठमोरी स्त्री काहीतरी अनाकलनीय गूढ बडबड करत असते. तर देवीसमोरच एक मध्यमवयीन स्वमग्न मुलगी (सायली नरवणे) स्वतःचीच चाळा करताना दिसते. त्या गावात असलेल्या एका लावण्यवती जोगतिणीवर (अश्विनी वसगडेकर) कुंभार, शिंपी, गुरव आणि भटाची वाईट नजर असते. पण ती कुणाच्याच हाती लागत नाही.

पुढे तिला कोणापासून तरी दिवस जातात. जन्माला आलेल्या बाळाला ती देवीच्या पायरीवर ठेवून कायमची गाव सोडून निघून जाते. पुढे त्या गावचे पाटील (सागर खिस्ती) त्या मुलीचा म्हणजेच अमाशीचा सांभाळ करतात. जोगतीण आईच्या पापामुळे जन्माला आलेल्या आमाशीचा गावकरी रागराग करत असतात. पाटलांनी अमाशीला लावलेला जीव पाटलीण बाईंना (संध्या पावसे) आणि गावकऱ्यांना देखवत नाही. गावात पडलेल्या दुष्काळाला अमाशीला कारणीभूत ठरवलं जातं. अंगात वारं येणारी जोगतीण गावावरील विघ्न टळावे यासाठी (रखमा) नरबळीची मागणी करते. त्यानुसार गावकरी अमाशीचा बळी देण्याची योजना आखतात. पण, ऐनवेळी पाटील येऊन अमाशीचे रक्षण करतात आणि नाटकाचा पडदा पडतो.

प्रदीप रासकर आणि विद्या जोशी यांनी दिग्दर्शनाची जबाबदारी सक्षमपणे पार पाडली. संवेदनशील पाटलांच्या भूमिकेसाठी सागर खिस्ती यांनी चांगली मेहनत घेतली. सायली नरवणे हिने एकही संवाद नसलेल्या अमाशीचा आंगिक अभिनय उत्कृष्टपणे केला. प्रदीप रासकर, कृष्णा वामने, अमोल तोडकर, साई चासकर यांनी केलेल्या गावकऱ्यांच्या भूमिका उत्तम. अश्विनी वसगडेकर यांनी विठा जोगतिणीचे पात्र चांगले वठवले. भिवा हे पात्र अनिकेत जोशी यांनी साकारले. विद्या जोशी यांचा देवी अंगात आलेला अभिनय भाव खाऊन गेला. अपर्णा देशेट्टी यांनी भिमाक्का हे पात्र चांगले साकारले.

अंजना मोरे यांचं नेपथ्य पाहताक्षणी नजरेत भरणारं होतं. उत्तम नेपथ्यामुळे कथानकात जिवंतपणा आला. गणेश लिमकर यांची संहितेनुरूप प्रकाशयोजना चांगली वाटली. विनायक पावसे यांचे संगीत संयोजन आणि चंद्रकांत सैंदाणे यांची रंगभूषा व वेशभूषा उत्तम होती. संवादातल्या काही मोजक्या चुका सोडल्या तर एकंदरीत गावाकडील अनिष्ट प्रथांचे आणि त्याबरोबरच माणुसकीचे चित्रण प्रेक्षकांपुढे उभे करण्यात आणि त्यांना अंतर्मुख करण्यात नाटक यशस्वी झाले.

# आश्रम शाळेच्या विद्यार्थ्यांनी घेतली राष्ट्रपतींची भेट

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

अप्पर आयुक्त कार्यालय आदिवासी विकास विभाग नाशिक अंतर्गत येणार्या शासकीय आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांसाठी टॅलेंट सर्च परीक्षा आयोजित करण्यात आली होती. महाराष्ट्रातील एकूण २४ हजार विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली होती. या विद्यार्थ्यांतून यशस्वी झालेल्या निवडक २४ विद्यार्थ्यांना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याशी भेटण्याची संधी मिळाली आहे. या २४ विद्यार्थ्यांमध्ये राजूर प्रकल्पातील चार विद्यार्थ्यांचा समावेश होता.

यात शासकीय माध्यमिक आश्रमशाळा जवळे बाळेश्वर (ता.संगमनेर) या शाळेतील ऋतेज विलास डामसे (इयत्ता-नववी), विक्रम कांतीलाल पिचड (पिंपरकणे, ता.अकोले), उमेश विश्वनाथ वायाळ (केळी कोतूळ, ता.अकोले), ऋषीकेश पांडुरंग भांगरे (आदर्श आश्रमशाळा मवेशी, ता.अकोले) या विद्यार्थ्यांची निवड झाली होती. ७ ते ११ डिसेंबरअखेर झालेल्या राष्ट्रपती भेटीच्या सहलीत केंद्रीय रस्ते व वाहतूक विकास मंत्री नितीन गडकरी यांचीही मुलांशी भेट झाली. सदर सहलीत मुलांनी दिल्लीतील विविध ऐतिहासिक स्थळांना भेटी दिल्या. जाताना रेल्वेने प्रवास तर येताना दिल्ली ते नाशिक विमान प्रवासाचा अद्भुत अनुभव मुलांनी घेतला. निवड झालेल्या यशस्वी विद्यार्थ्यांचे राजूर प्रकल्पाच्या प्रकल्प अधिकारी देवकन्या बोकडे, सहायक प्रकल्प अधिकारी मनोज पैठणकर, दीपक कालेकर यांनी कौतुक केले. जवळे बाळेश्वर येथील विद्यार्थ्यांचे शाळेच्यावतीने मुख्याध्यापक आदिनाथ सुतार, वर्गशिक्षक देविदास रणमाळे, अधीक्षक दीपक गुंडेकर, अधीक्षिका सुरेखा नाईकवाडी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी यांनी बुधवारी जोरदार स्वागत केले. यावेळी सरपंच बंटी पांडे, उपसरपंच अतुल कौटे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विठ्ठल डामसे, उपाध्यक्षा सुनीता करवंदे, उपसरपंच अतुल कौटे, सोमनाथ करवंदे, पांडुरंग कौटे, रामदास भांगले, भाऊसाहेब कौटे, बन्सी चिखले, बाळू कौटे, शिंगाडे सर उपस्थित होते. तसेच यशस्वी विद्यार्थांना शिक्षक श्रीनिवास सूर्यवंशी, श्रीगणेश पवार, सुरेखा गायकवाड, नितीन पायके, दिलीप धांडोरे, संजय सुपे, संतोष गायकर, अश्विनी शिंदे, कल्पना सुकटे, गणेश खतोडे, विजय लोहार यांचे मार्गदर्शन लाभले.



# तळणी शाळेची उल्लेखनीय कामगिरी

## माझी शाळा सुंदर शाळा अभियानात तृतीय क्रमांक

**शेवगाव । प्रतिनिधी**

गुणवत्ता, विविध गुणदर्शन स्पर्धेतील अनेक बक्षिसे,शासन धोरणाची अंमलबजावणी ,विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबवलेले अभिनव उपक्रम, विद्यार्थ्यांची संपादणूक आणि लोकसहभागातून शाळेचा कायापालट झाला. त्यामुळे महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानात तळणी प्राथमिक शाळेने तालुक्यात तृतीय क्रमांकाचे बक्षीस पटकावले.



तळणी गावचे सरपंच सौ.शोभाताई अनिलराव झिंज, उपसरपंच दादा पाटील घनवट सर्व ग्रामपंचायत पदाधिकारी , पोलिस पाटील बाळासाहेब घुले व ग्रामस्थांच्या उपस्थितीत शाळेचे मुख्याध्यापक श्री. विक्रम काकडे , उपमुख्याध्यापक श्री.मुकुंद शेळके , श्रीम.शारदा दिक्षित या तीनही शिक्षकांचा सन्मान करण्यात आला.

अध्यक्षीय मनोगतात सरपंच सौ. झिंज म्हणाल्या की, शिक्षकांच्या अथक परिश्रमाने शाळा नावारूपास आली. तसेच माजी सरपंच शिवाजी घुले यांनी आज पर्यंतच्या इतिहासामध्ये शाळेचा येवढा मोठा गौरव कधी ही झाला नाही तो या बक्षीस रूपाने या वर्षी झाला, असे गौरव उदगार काढले.मुख्याध्यापक विक्रम काकडे म्हणाले, हा पुरस्कार मिळवण्यामध्ये विद्यार्थी पालक व गुरुजनांचा मोठा वाटा आहे. आमची जबाबदारी वाढलेली आहे. भविष्यात जिल्हास्तर व राज्यस्तरावर शाळेचा लौकिक वाढवण्यासाठी आम्ही सदैव प्रयत्न करू, यावेळी तळणी गावचे ग्रामसेवक सुनील गोरे ,शाळा समिती अध्यक्ष श्री. सुनिल झिंज, अनिल झिंज , बाळासाहेब महाडिक , राहूल बढे, सतीश डमाळ, बबन घनवट, शिवाजी घनवट , शहादेव अनंतपुरी, प्रशांत भिसे, दीपक तुपविहिरे, विष्णु शहाणे, शाहीर मधूकर तूपविहिरे, सौ.मंदाकिनी घनवट, पद्मा घनवट, वर्षा तूपविहीरे, जिजाबाई घुले,कस्तुरा तुपविहीरे,सुनंदा तुपविहिरे आदी पालक मोठया संख्येने उपस्थित होते.पुरस्कारासाठी शाळेची निवड झाल्याचे समजताच गटशिक्षणाधिकारी तृप्ती कोलते मॅडम, विस्ताराधिकारी श्रीम. शैलजा राऊळ मॅडम, श्री.डॉ. शंकर गाडेकर साहेब, केंद्रप्रमुख श्रीम. मीरा केदार मॅडम व पालकांनी शिक्षकांचे अभिनंदन केले.

# ॲड.चिमाजी धोंडीबा बाबर राष्ट्रीय मराठा पार्टी महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष पदी नियुक्ती



**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

अँड चिमाजी धोंडीबा बाबर सेवानिवृत्त पोलीस अधिकारी असून पोलीस महासंचालक सन्मान पदक प्राप्त. राष्ट्रपती पोलीस पदक प्राप्त. संस्थापक अध्यक्ष सेवानिवृत पोलीस अधिकारी व कर्मचारी कल्याण प्रतिष्ठान लातुर (कार्यक्षेत्र) महाराष्ट्र राज्य यांचे उत्तम व उत्कृष्ट कार्याची पावती म्हणून त्यांची राष्ट्रीय मराठा पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष म्हणुन नियुक्ती करण्यात आली आहे.महाराष्ट्र राज्यातील स्थानीक स्वराज्य संस्थांमधील महागरपालिका ,नगरपरिषद, जिल्हापरिषद, पंचायत समिती निवडणुकीत सहभाग घेऊन भगवा झेंडा फडकावा.

राष्ट्रीय मराठा पार्टी च्या ध्येय धोरणानुसार व घटनेनुसार आपण कार्य करावे आई तुळजाभवानी आपल्या कार्यास सुयश देवो हिच शुभेच्छा नियुक्तीपत्र देण्यात आल्या आहेत. या निवडीचे स्वागत व्यंकट टेकाळे,बाळासाहेब बनसोडे,वैजनाथ गणाचार्य,नारायण गुण्डागर्दी जाधव ,मुरलीधर थडकर,शिवाजी बिराजदार, अशोक राठोड,गोविंद पवार, व्यंकट फुले,सूर्यकांत चिल्ले,विजयकुमार जाधव ,बलराज लंजिले,शिवाजी सोनकांबळे,बालाजी अटरगे,रावसाहेब देशमुख ,रामचंद्र, विनायक पाटील, यांनी केले .

# मयूर सुतार यांच्या पाठपुराव्यामुळे उरण पनवेल मार्गावर गतिरोधक

## गतिरोधक बसवल्याने होणार अपघाताचे प्रमाण कमी ;प्रवाशी,नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण

**उरण । प्रतिनिधी**

उरण तालुक्यात अनेक ठिकाणी गतिरोधक (स्पीड ब्रेकर) नसल्याने अनेक अपघात झालेले आहेत.या अपघातात अनेक जण गंभीर जखमी झाले तर काही जणांचे मृत्यू देखील झाले आहेत. गतिरोधक नसल्याने अनेक अपघात वाढत चालले आहेत. आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके हायस्कुल मुळेखंड येथे शाळेत येताना जाताना विद्यार्थ्यांच्या जीवालाही रस्ता क्रॉस करताना धोका निर्माण झाला होता. वाहने वेगात जात असल्याने लहान मुलांना व पालकांना जीव मुठीत घेउन प्रवास करावा लागत होता.ही प्रमुख समस्या लक्षात घेऊन प्रवाशांचे , नागरिकांचे अपघात होऊ नयेत,अपघात होऊन कोणाचे मृत्यू होऊ नयेत या दृष्टिकोनातून प्रवाशी वर्गांचा प्रवास सुखकर, आनंददायी व्हावा या हेतूने उरण मधील सामाजिक कार्यकर्ते मयूर सुतार यांनी उरण पनवेल मुख्य मार्गावर आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके हायस्कुल मुळेखंड येथे स्पीड ब्रेकर (गतिरोधक ) बसविण्यात यावे अशी मागणी सिडको व सार्वजनिक बांधकाम विभागाकडे केली होती. त्यासाठी त्यांनी सातत्याने पत्रव्यवहार करून पाठपुरावाही केला होता. आता या पाठपुराव्याला यश आले असून मयूर सुतार यांच्या मागणीची दखल घेण्यात आली असून आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके हायस्कुल समोर, मुळेखंड येथे गतिरोधक बसविण्यात आले आहेत. गतिरोधक बसविल्याने विविध वाहने सावकाश व शिस्त बद्ध पद्धतीने येत जात आहेत.गतिरोधक बसविल्याने आता नागरिकांचा प्रवास सुखकर, आनंददायी बनला आहे. गतिरोधक मुळे आता अपघातांचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार आहे.शाळेतील लहान मुलांना आणि त्यांच्या पालकांना आता शाळेत येणे जाणे सोप्पे, सुलभ झाले आहे.त्यामुळे उरण मधील नागरिकांनी, जनतेने, शाळेतील विद्यार्थी, पालकांनी, शिक्षकांनी सामाजिक कार्यकर्ते मयूर सुतार यांच्या कार्याचे कौतुक करत त्यांचे आभार मानले आहेत.



# राहुल मुंडे प्रतिष्ठानच्या वतीने दत्त जयंती सामाजिक उपक्रम राबवून साजरी




**केज । प्रतिनिधी**

केज शहरातील शिक्षक कॉलनी भागातील कर्तबगार युवक राहुल प्रकाश मुंडे यांचे काही दिवसांपूर्वी दुःखद अपघाती निधन झाले आहे.राहुल मुंडे हा कर्तबगार युवा तरूण होता.त्याच्या अकाली जाण्याने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. राहुल मुंडे चा मोठा मित्र परिवार आहे.या सर्व राहुल च्या जिवलग मित्रांनी राहुल मुंडे प्रतिष्ठान ची स्थापना केली आहे. राहुल प्रतिष्ठानच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम राबविण्याचा मानस या तरुण युवकांनी राहुल प्रतिष्ठानची स्थापना करताना व्यक्त केला होता.याकामी त्यांना एम.डी घुले सर, सुधाकर ढाकणे सर, अशोक भैया तांदळे, गायकवाड सर, मुळे सर, सुर्यवंशी दादा सर, राजसाहेब ढाकणे, गोटू पाळवदे, वैभव केंद्रे, संदीप भुतडा, अशोक घुले, डॉ विजयकुमार धस, अशोक आंधळे , गोविंद काळे,व इतर अनेक मान्यवरांनी समर्थ साथ दिली आहे. याचाच एक भाग म्हणून आज दत्त जयंती निमित्ताने शिक्षक कॉलनी भागातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत गरजवंत विद्यार्थी व विद्यार्थिनींना वह्या व पुस्तकाचे वाटप करण्यात आले. सर्व प्रथम दत्त जयंती निमित्ताने पुजन करून व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून वह्या व पुस्तकाचे वाटप कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून जाधवर मॅडम ,मुंडे मॅडम, वाघमारे मॅडम व गायकवाड सर उपस्थित होते.राहुल मुंडे प्रतिष्ठानचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी किरण वाघमारे, अशोक लांडगे ,समर्थ पारखे, ओम केदार ,सुनील शिंदे ,योगेश गायकवाड , ओम काळे,अजय मैंद व रुद्र तांदळे यांनी परिश्रम घेतले.

# उद्धव ठाकरेंचे हिंदुत्वाविषयी बेगडी प्रेम भाजपा गटनेते आ.प्रविण दरेकरांची टीका


**मुंबई । प्रतिनिधी**

उद्धव ठाकरे यांचे हिंदूंच्या, हिंदुत्वाविषयीचे प्रेम बेगडी आहे. ज्यावेळी साधू हत्याकांड झाले त्यावेळी राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे होते. त्यावेळी उद्धव ठाकरेंनी काय भुमिका निभावली ते संपूर्ण महाराष्ट्राने पाहिलेय, अशा परखड शब्दांत भाजपा विधानपरिषद गटनेते आमदार प्रविण दरेकर यांनी उद्धव ठाकरेंवर टीका केली आहे.

पत्रकारांशी संवाद साधताना आ. दरेकर यांनी उद्धव ठाकरे यांनी मंदिर, हिंदुत्वाबाबत केलेल्या विधानाला चोख प्रत्युत्तर दिले. ते म्हणाले की, बांगलादेशात असणाऱ्या हिंदूंच्या मागे भाजपा पूर्णपणे ताकदीनीशी उभी आहे. त्यांच्यासोबत आमच्या संवेदना आहेत. केंद्र सरकारही त्यांच्या रक्षणासाठी कटीबद्ध आहे. केंद्राने याबाबत नागरिकत्व दुरुस्तीचा कायदा आणला आहे. त्यावेळी उद्धव ठाकरेंच्या पक्षाने बोटचेपी भुमिका घेतली. हिंदूंविषयी किंवा हिंदुत्वाविषयी बोलण्याचा त्यांना नैतिक अधिकार नाही.

तसेच ज्यांनी बाळासाहेबांच्या हिंदुत्वाचा विचार सोडला आणि सत्तेच्या लाचारीसाठी ज्यांनी आयुष्यभर हिंदुत्वावर टीका केली, सावरकर यांच्याविषयी गरळ ओकली त्या काँग्रेसच्या मांडीला मांडी लावून बसणाऱ्या उद्धव ठाकरेंना बोलण्याचा अधिकारच उरत नाही. राहुल गांधी, मल्लिकार्जुन खर्गे यांनी सातत्याने सावरकरांचा अपमान करणारी विधाने केली आहेत. सावरकरांची प्रतिमाच काढा असे जेव्हा काँग्रेसने सांगितले तेव्हा उद्धव ठाकरेंच्या तोंडाला कुलूप लावले गेले होते का? असा सवालही दरेकरांनी उपस्थित केला.

दरेकर पुढे म्हणाले की, उद्धव ठाकरे पराभवाने खचले आहेत. कटेंगे तो बटेंगे, हम सब एक है तो सेफ है या नाऱ्यांनी जो प्रतिसाद दिला आणि उद्धव ठाकरे, महाविकास आघाडीची जी धुळधाण उडालीय त्यातून ते हतबल झालेत. त्यातून अशा प्रकारच्या नवीन क्लुप्त्या काढून वातावरण निर्माण करण्याचा केविलवाणा आणि दुर्दैवी प्रयत्न उद्धव ठाकरेंचा



सुरू आहे. हनुमान मंदिराच्या बाबतीत आता जागे झालेत. रेल्वे प्रशासनाने जी काही नोटीस पाठवली आहे ती आम्ही बघून घेऊ. परंतु राम मंदिराच्या निर्माणावेळी कुतसितपणाने टोमणे मारणाऱ्या उद्धव ठाकरेंना आता मंदिरांची आठवण आली. नक्कीच आमच्या देवदैवतांनी, हिंदुत्वाने त्यांना जमिनीवर आणलेय. त्यामुळेच त्यांना आता ही भुमिका नाईलाजाने का होईना घ्यावी लागतेय, असा टोलाही दरेकरांनी लगावली.दरेकर पुढे म्हणाले की, पाच वेळा मंदिराला नोटीस पाठवली त्यावेळी आमचे सरकार नव्हते. आता नोटीस गेलीय म्हणजे लगेचच मंदिर तोडले असे होत नाही. केंद्र आणि राज्य सरकार लक्ष घालेल आणि निश्चितच मंदिराचे रक्षण करणे किंवा त्यांची पुनःस्थापना योग्य पद्धतीने करणे ही आमची जबाबदारी असून त्यापासून कसुभरही मागे हटणार नसल्याचे दरेकरांनी सांगितले. आ. दरेकर पुढे म्हणाले की, मंत्रिमंडळ विस्ताराची कल्पना नाही. याबाबत अंतिम निर्णय राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस घेतील. दोन उपमुख्यमंत्री आणि त्या पक्षाच्या नेत्यांशी चर्चा करून तथापी फडणवीसांनी सुतोवाच केले होते की, नागपूर अधिवेशनापूर्वी मंत्रिमंडळाचा विस्तार होईल. १६ तारखेला अधिवेशन आहे त्याआधीच मंत्रिमंडळाचा विस्तार होईल अशी अपेक्षा बाळगायला हरकत नाही. विरोधकांनी चिंता करायचे कारण नाही. महाराष्ट्रात तीन पक्षाचे, महायुतीचे सरकार आहे ज्यावेळी अशा प्रकारचे सरकार असते त्यावेळी एकमेकांच्या जागा, खातेवाटप निश्चित करणे हे नीट व्हावे लागते. येणाऱ्या काही दिवसात ते होईल आणि महाराष्ट्राला स्थिर, भक्कम सरकार मिळेल.पटोलेंच्या पदमुक्त करण्याच्या मागणीवर आ. दरेकर म्हणाले की, तो त्यांच्या पक्षाचा विषय आहे. नाना पटोले यांना पदमुक्त करायचे की काँग्रेसला सावरण्याचा प्रयत्न करायचा की काँग्रेसला आणखी अधोगतीला जाऊ द्यायचे, हा त्यांच्या पक्षातील विषय आहे. नाना पटोले यांनाच परत प्रदेशाध्यक्ष ठेवा, म्हणजे आमचे काम आणखी सोपं जाईल. पटोलेंच्या वायफळ बोलण्यातून, वागण्यातून आणि त्यांच्या कृतीतून आम्हालाच मदत होत असते, असा टोलाही दरेकरांनी लगावला.